श्री साईनाथ प्रसन्न

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ३ रें.] फाल्गुन शके १८४७ [अंक १२ वा

नलिनीदलगत जलमतितरलम्। तद्वज्जीवनमतिशय चपलम्॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका। भवति भवार्णवतरणे नौका॥
श्री शंकराचार्य.

संपादक:—लक्ष्मण गणेश महाजनी.
प्रकाशक:—रामचंद्र आत्माराम तर्खड.
श्री साईलीला कचेरी ५ इनॅार रोड पार्ले, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.


महाराजांचे अनुभव ... ... ... ... ३२३-३३२

स्फुट विषय ... ... ... ... ... ३२७-३६४


## मासिकाच्या वर्गणीदारांस विनंति.

हें मासिक सुरू करण्यांत याच्या चालकांचा हेतू याची कमाई व खर्चवेंच भागून राहिलेलें उत्पन्न श्रीसाईबाबांच्या एखादे फंडास जमा व्हावें असा असल्यामुळें, प्रत्येक वर्गणीदारानें मनांत आणल्यास आपापल्या मित्रांमधून निदान एकतरी वर्गणीदार मिळविण्याचें श्रेय घेतल्यास एकंदरीनें कितीतरी मदत केल्यासारखें होणार आहे. शिवाय अशा रीतीनें मदत करणाऱ्यानें श्रीसाईसमर्थांची पर्यायानें सेवा केल्यासारखेंच होणार आहे.

यापुढें श्रीसाईलीलेचे अंक दर महिन्याचे पौर्णिमेपर्यंत पोष्टांत पडतील व ते ग्राहकांस दर महिन्यास वद्य १० पर्यंत पोहोंचले जातील अशी तजवीज ठेविली आहे. पोष्टांत क्वचित् अंक गहाळ होत असतील व यामुळें जर ग्राहकांनीं अंक न मिळाल्याची तक्रार पुढील महिन्याचे अमावास्येपर्यंत आमचेकडे केली तरच त्यांना पुन्हां अंक पाठविण्यांत येईल.

या मासिकासंबंधानें पत्रव्यवहार करणें तो खालीं सही करणार यांचे नांवानें खालीं लिहिलेल्या पत्त्यावर करावा.


**गोविंद रघुनाथ दाभोळकर.**

श्रीसाईलीला ऑफिस, ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें बी. बी. सी. आय्. रेल्वे.


## वर्गणीचे दर

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनीआर्डरनें अगाऊ रु. ३।≈ व्ही. पी. नें रु. ३॥. चालू अंक -।≈. मागील अंक शिल्लक असल्यास -॥-.

## शुद्धाशुद्ध.

वर्ष ३ पौष १८४७ चा अंक १० वा. यांत पृ. ३०८ वर ५ रु. रा. रा. शिवराम गणेश गुतें यांचेकडून म्हणून जमा आहेत ते वास्तविक त्यांच स्वतःचे नसून श्रीराममारुती संस्थानमार्फत आलेले आहेत म्हणून समजावें.

या अंकांत स्फुट विषयाच्या शेवटच्या आठ पानांचे नंबर चुकीनें १५७ ते १६४ पडले आहेत त्याऐवजी ते ३५७ ते ३६४ आहेत असें समजावें.

श्री क्षेत्र शिर्डी येथील साईबाबा यांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहवासाचा अनुभव. (शंकरराव [illegible])

सन १९०७ सालापासून संत दर्शनाची व त्यांची चरित्रें व गाणें ऐकण्याची उत्सुकता उत्पन्न झाली. प्रथम दर्शनलाभ मला फक्त श्रीसमर्थ नारायण महाराजांचा मु॥ मुलुंड जि॥ ठाणें येथें झाला. त्यापूर्वी मी आसनें प्राणायामादि प्रकार आचरीत होतो. यापुढें कांहीं दिवसांनीं श्री दासगणू यांचीं कीर्तनें ऐकण्याची सुसंधी वांद्रे मु. श्री. रा. गोविंदराव दाभोळकर यांचे घरीं मिळूं लागली. तेव्हां पासून प्राचिन संतांचे श्रेष्ठत्व अर्वाचीन देहधारी असलेल्या संतांमध्यें अनुभवास येऊं लागलें. त्यानंतर फक्त प्रत्यक्ष संतदर्शनाची उत्सुकता वाढूं लागली व अर्वाचीन कांहीं संतविभूतींचीं प्रत्यक्ष दर्शनें आपोआप होऊं लागलीं त्यापैकीं श्री. साईबाबायांचें एक दर्शन होय. ती हकीगत येणेंप्रमाणें:—

श्रीसद्गुरू नारायण महाराज याचे शिष्य वृंदांपैकीं एक माझे मित्र सिमला मुक्कामीं गव्हमेंट रेल्वे बोर्डमध्यें नोकरीस असणारे लाला मदनगोपाल यांनीं मु. केडगांव येथें आपलेबरोबर येण्याविषयीं वसई मुक्कामीं मला पत्र पाठविलें. त्यावेळीं मी वसई कोर्टमध्यें नोकरीस होतों. त्याप्रमाणें मी सात दिवसांची रजा घेऊन मि.मदन गोपाल यांच्या ठराविक व्यवस्थे प्रमाणें कल्याण मुक्कामीं त्यांना भेटून तेथून बरोबर जाण्याकरितां वसईहून निघालों. प्रथम मी विलेंपार्लें येथें मदनगोपालचे बंधूकडे उतरलों. त्याच दिवशीं सायंकाळीं मदन गोपालचा सिमल्याहून टेलिग्राफ त्याचे बंधूस आला व केडगांवला जाण्याचा आजचा बेत कांहीं कारणानें रद्द केला आहे असें मि. "शंकर-राव यांसही कळवावें असें लिहिलें होतें. मी तर येऊन पोहोंचलों व घेत-लेली रजा कमी करून परत जाण्यापेक्षां येथेंच ७ दिवस काढावे असें ठरविलें. इतक्यांत माझे मित्र लाला लखमीचंद हे त्याच दिवशीं सायंकाळीं मला भेटले. तेही पार्लें येथेंच रहात असत. त्यांनीं आपला स्वतःच शिर्डीला जाण्याचा इरादा दर्शविला व मला शिर्डीला आपले बरोबर येण्या

विषयी सांगितलें, त्यांतील मुख्य उद्देश हा की त्यांना एकमेकांचे विचार एकमेकांस समजावून देणारा असा त्यांच्या ओळखीचा एक मित्र त्यांना बरोबर असल्यास पाहिजे होता. मीही विचार केला की येथें ७ दिवस बसून राहण्यापेक्षां मि. लखमीचंद बरोबर जावें व त्याप्रमाणें जाण्याचें ठरविलें. आम्ही दोघेही नवशिकेच होतों. तेथें वागावयाचें कसें, स्टेशन पासून साईबाबांचे ठिकाण किती दूर आहे, टांगाभाडे वगैरे संबंधी माहिती व बाबा संबंधी नवीन इसमाला भीतिप्रद वाटणारी इतर लोकांनी पसरलेली माहिती वगैरे संबंधीं मी विचार करीत होतों. कांहीं सर्व साधारण माहिती भाऊसाहेबांकडून मिळाली. त्यांनीं एक करंड व मि. रघुनाथराव-बाद्य यांनी एक हार बाबांना घालवयास दिला होता. व मि० कन्हैया लाल यांनीं बाबांना पेरू फार आवडतात म्हणून ४ चार आणे मजजवळ पेरू घ्यावयास दिले होते. आम्ही दादर स्टेशनवर ( बी.बी. ) उतरून ( जी. आय् पी. ) दादर स्टेशनवर मनमाडचे गाडींत बसलों. दादर स्टेशनवर कै. मि. "नानासाहेब चांदोरकर हे अचानक त्याच गाडीला कल्याणला जाण्या करितां म्हणून आले होते ते भेटले व त्यांनीं आमच्यांतला एक बोजा आपण घेऊन आमचें ओझें कल्याण पर्यंत कां होईना कमी करून पुन्हां कल्याणला आमचे कडे आणून दिला व आपला नमस्कार बाबांना प्रविष्ट करण्यास सांगितलें. येथून आम्ही दोघे जवळ जवळ सारी रात्र नाशीक पर्यंत भजन करीत होतों. मध्यंतरीं कसारा स्टेशनवर एक मुसलमान आमचे डब्यांत आला व आम्हीं त्याला शिर्डीची हकीगत विचारली. त्यांनें इत्थंभूत हकीगत आम्हास सांगितली व स्वतः मी शिर्डीला जात असतों असें तो म्हणाला. पुढें मनमाडला उतरून कोपर गांवचे गाडींत आम्हीं बसलों व सकाळीं ६ वाजतां स्टेशनवर उतरलों. त्यावेळी टांगा स्टेशनवर नव्हता. इतक्यांत भाऊसाहेब यांच्या इसमांचा टांगा आला व आम्हीं भाऊसाहेबां कडूनच आलों असल्याबद्दल त्याला सांगितलें. टांगेवाल्यानें आमचें सामान टांग्यांत घातलें व कोपरगावांत आम्हीं दोन तास विश्रांती घेतली तेथें श्रीगोदावरीचें स्नान केलें, चहा घेतला. आम्हांला न्हावी पाहिजे होता तोही

तेथेंच आम्ही उतरताक्षणींच मिळाला. पुढें ८चे सुमारास शिर्डीस जाण्याकरतां टांग्यांतून निघालों. प्रथम १०।१५ मिनटें घोडे चालेनात, न चालण्या इतके दुर्बळ ते नव्हते. कारण पारलें येथील एक दोन इसमांनी पेरू करितां पैसे दिले होते व ते पेरू या नदीच्या कांठीच घेणें होतें हें यावेळीं आम्हीं विसरलों होतों. आमचा मूळचाच समज कीं ते खुद्द ठिकाणी मिळत असतील या धोरणानें पेरू विकत घेण्याचे बाबतींत आम्ही निष्काळजी राहिलों. या दरम्यान एक पेरूवालीबाई लांबूनच ओरडत आली व म्हणाली दादा तुम्हाला पेरू घ्यावयाचे आहेत ना थांबा हे घ्या. व माझेही थोडे बाबांना द्या. हें कोडें काय आहे तें आम्हांला समजेना. आम्ही पेरू घेतले व करंडांत घालताक्षणींच घोड्यांचीही मस्ती थांबली व जे पंधरामिनीटेपर्यंत चाबूक खाऊन सुद्धां चालत नव्हते ते पेरू आमचे पदरीं पडतां क्षणींचभर धांव निघाले व शिर्डीला पोहोंचेपर्यंत पुन्हां त्यांनीं मार्गांत केव्हांहि स्ती केली नाहीं.

आम्हीं साठे साहेबांच्या वाड्यांत उतरलों त्यावेळी १००।१५० मंडळी तेथें आली होती. मि. नूलकर व बांद्रे येथील मि. निळकंठराव सहस्त्रबुद्धे हेही तेथें होते. चहापान आटोपतांच पुढें दर्शनास कसें काय जावें वगैरे संबंधीं मि. नूलकर यांना विचारलें. व मशीदीस गेलों. त्यावेळीं बाबा मशीदींत आजूबाजूचे लोकांस शिव्यागाळी करीत होते. फक्त एक देशस्थ ब्राह्मण त्यांचे पाठीमागें त्यांची पाठ चेपीत होता. बाकी मंडळीची पळापळ होऊन ती मशीदीचे बाहेर बसली होती. इतक्यांत आम्हीं दोघे पेरू इतर हार वगैरे घेऊन तेथें थबकलों. तेथील प्रकार पाहून सर्वांनी आम्हांस सांगितलें कीं तुम्ही वर जाऊं नका बाबा फार रागावले आहेत. तें ऐकून मि. लखमीचंद थोडा कचरला. परंतु मी मुळींच लक्ष न देतां एकदम पायरीपर्यंत तडक गेलों. त्यावेळी त्यांचे संबंधी (first impression) माझें प्रथम मत हे अक्कलकोटचे महाराजच आहेत असें जाहलें. व त्यांचा चेहरा मला तसाच वाटला.

तरी तशाच त्यांच्या क्रुद्ध वृत्तीमध्यें ते असतां मी पायरी जवळ दोन मिनिटें उभा होतों. त्यांचे तामसी शब्द माझे कानावर पडतच होते. परंतु माझी ही वृत्ती कांहीं अंशीं तशीच झाल्याकारणानें त्यांच्या इतर शिव्यागाळी काय होत्या त्या मला सांगतां येणार नाहींत परंतु " जाव इदरसे " हे शब्द मी ऐकलें व त्यांचे पाठीमागें त्यावेळीं असलेला एक काळया वर्णाच्या देशस्थ ब्राह्मणानें याच वेळीं सांगितलें कीं थोडया वेळानें या व हातानें खुणावलें. मीहीं "पुन्हां बाबांनीं आपण होऊन हांक मारल्याशिवाय जाणार नाहीं " असा निश्चय करून पाठी फिरलों व मशिदीच्या भिंतीआड बसलों. व मि. लखमीचंदकडेही हीच करारी वाणी काढली. इतक्यांत "सद्गुरु माय प्रेमळच असते" हा अनुभव १।२ मिनिटांतच आला व प्रथम बाबांनीं आम्हा दोघांनाच बोलावण्याकरितां त्यांचे जवळील इसमास पाठविलें व तो खालीं उतरून आम्हांला बोलावण्यास आला व त्यासरसे मी व लखमीचंद एकदम बाबांचे पायापाशींच जाऊन बसलों. त्याबरोबर आजूबाजूचे शेंकडो लोक जमा झाले. नंतर हार घालणें, आरत्या करणें वगैरे प्रकार झाले. पेरू वगैरे बाहेर लोकांना वांटण्याकरितां बाबांनीं फेंकले व एक पेरू फोडून अर्धा मला व अर्धा लखमीचंद यांस दिला. उदी लावली व शेवटीं 'खाना खाव और वाडेमे आराम करो' असा हुकूम केला. आम्हीं त्यादिवसापासून दोन तीन दिवस त्या वाडयामध्येंच काढले. फक्त सकाळीं मशिदीमध्यें दर्शनाला जात असूं. व ७।८ चे सुमारास बहिर्विधीला बाबा जात असतां त्यांचें रोज दर्शन होतच असे पुढें २-३ दिवसांत मुंबईची मंडळी जाऊं लागली व शेवटीं ३रे ४ थे दिवशीं फक्त कै० वा० रा.राजूलकर रा. रा. सहस्त्रबुद्धे व आम्ही दोघे एवढेच वाडयांत राहिलों मि.सहस्त्रबुद्धे यांनीं त्यावेळीं जरी पूर्ण नाहीं तरी पूर्वींच्या आचार विचारांत इकडे येण्यानें बराच फेरफार होण्याइतका परिणाम आपणावर झाला असें कबूल केलें,

आम्हीं दोनतीन दिवस 'पुखा' झोडीतच तेथें बसलों होतों, परंतु माझे विचारतरंग फार निराळेच चालत. मी म्हणे " हे जर सत्पुरुष आहेत तर लोकांना शिव्या देणें, क्रोध करणे वगैरे महातामसी प्रकार यांचे

चालू आहेत. तर अशा वृत्तीनें लोकांचें काय कल्याण होणार आहे ? व जगाचे कल्याणाला याचा काय उपयोग होणार ! मी तर येथें विनाकारण आलों यांचेपासून जर कांहीं सदुपदेश वगैरे होत नाहीं तर येथें रहावयाचें कशाला ? हे तर " खाना खाव और आराम करो" याशिवाय कांहींच सांगत नाहींत.

वरील विचार २।३ दिवस सारखे चालत असत. इतक्यांत मुंबईची सर्व मंडळी निघून गेलीं. ३ रे ४ थे दिवशीं सकाळीं ७।८ वाजतां विहिरीवर स्नान करून चहा घेऊन मि. नूलकरांबरोबर गप्पा मारीत बसलों इतक्यांत नूलकर वाडयाच्या माडीवर निघून गेले. पुढें २।३ मिनिटांत उदाचा घमघमाट येऊं लागला व तो कोठून येतो तो मी पाहूं लागलों. वाडयांत उद कोणीही पेटविला नव्हता. इतक्यांत लक्ष्मीचंद व मी मशीदींत बावांकडे जाण्याचें ठरविलें व उठलोंही व दरवाज्याच्या बाहेर पडलों तरी उदाचा वास मशिदी पासून सारखा येतच होता व तो आम्हीं तेथें पोहोंचतांच थांबला. प्रत्यक्ष मशिदींत सुद्धां कोणीही ऊद पेटविला नव्हता. तेव्हां आमची खात्री झाली कीं हा एक बावांचा जासूदच आहे. व आम्हीं तेथें यावें याबद्दल हें त्यांचें प्रसाद खुणेचें बोलावणेंच आहे. तेथें बसल्यावर आम्हां दोघांना दोन पाय चेपावयास बाबांनीं सांगितलें मी उजवीकडे बसलो व तो डावीकडे बसला होता. तेवढयांत चिलमी आणावयास एका इसमास बाबांनीं सांगितली. त्यांनी ती प्रथम ओढून माझ्या हातांत दिली, पुन्हां ओढून लखमीचंद याला दिली. त्यानें याप्रमाणें तीन वेळ ओढली मी नुसती हातांतच धरली माझा समज हा कीं त्यांनी ती कांहीं मला ओढावयास दिली नसून थोडया विश्रांती खातर मजजवळ दिली आहे. व ती ओढावी अशी त्यांची इच्छा असल्यास ते मला सांगतील तेव्हां ओढीन. तेथपर्यंत मी कांहीं साईबाबा नाहीं किंवा त्यांचे बरोबरीचा नाहीं कीं मी ओढलेली त्यांनीं ओढावी हें करणें अपमानास्पद आहे असा माझा ग्रह झाला. लखमीचंद तर ओढीतच होता. वरील विचार येतांच बाबांनीं आपण ओढून

'लेव' म्हणून मला दिली, त्याबरोबर मी चिला झुरका दिला व पुन्हां दोन वेळ देऊन चिलीम बदलली. चिलीम ओढण्याचे वेळांत स्वतःशीच बाबांचें बोलणें चाललेलें होतें त्यांतील मजकूर कांहीं लक्ष्मीचंद संबंधी होता व कांहीं मजविषयीं होता. त्यांनीं माझे आजोबाचे वेळेपासून त्या तारखे पर्यंतचा सास इतिहासाचा पाडा गाईला. त्यांतून पुष्कळ गोष्टी मला माहीत नव्हत्या त्या मी घरीं आल्यावर खऱ्या ठरल्या. व कांहीं मला माहीत होत्या त्या बद्दल मला आश्चर्य वाटलें. आमचे आजोबाचे गुरू १२ वर्षें आमचे घरीं होते त्याबद्दल त्यांनीं उल्लेखही केला तो असा:—

**मेरा बाप और मा था. हम१२ बरस उसके पास रहे. उसने मेरा पालन बहोत अच्छा तऱ्हेसे किया.मेरा मा बापकू बहुत आदमीनें आप्तइष्ट सोयरेनें सता दिया. उसका कुछ कमती हुवा क्या? ओ मेरे पास है. हमारावी कुच कमती हुवाक्या? जिसनें उसकू सता दिया उसका अल्ला देखते हैं. देखो, अच्छा तऱ्हसे चलो अल्ला अच्छा करता है. बुरा तेऱ्हेसे चलेंगे तो बुरा होता है. हम गाणगापूरमेंवी है, पंढरपुर मे बी है सब ठिकाणमें हैं, सब जगमे हम है और हमारे पास सबजग है. जिसकु तुम पकडा है उसकू छोडना नहीं. दो चार दिनसे अल्ला पावेगे.**

याप्रमाणें पुष्कळच भाषण होऊन उदी घेऊन त्यांनीं माझ्या सर्व तोंडावर फांसली व **खाना खावो और आराम करो** असें सांगून खोबऱ्याचा प्रसाद देऊन आम्हांला जेवण्यास पाठविलें. त्याच दिवशी आम्हांला मुंबईत यावयास निघणें होतें व त्यांनीं परवानगी दिलीही. आम्ही लगेच वाड्यांत आलों जेवण उरकलें व बांधाबांध केली, आम्हांला ३॥ वाजतां निघणें जरूर होतें. पैसे सर्व खलास झाले होते. कै. वा. नूलकरांकडून मी पांच रुपये उसने घेतले त्यांतूनही दुसरा किरकोळ खर्च वजा जातां १॥. रुपया शिल्लक राहिला. सदर्हू शिल्लकेमध्यें वसईस येणें शक्य नव्हतें. पुन्हां आणखी रक्कम मागण्याचीही आम्हांस लाज वाटली.

मला दुसरे दिवशीं ११ वाजतां ड्यूटीवर हजर राहणें जरूर होतें. तीन वाजले. शिवाय टांगा नाहीं, पैसा नाहीं. जा म्हणून हुकूम आलेला. तेव्हां २॥ चे सुमारास Parting salutation पुन्हां भेटून जावें म्हणून दोन नारळ घेऊन दर्शनास गेलों. त्यावेळीं बाबांचें भोजन संपलें होतें, बाबांनीं उदी व नारळ प्रसाद दिला व तुमकू कल ऑफीसमें जानेका है अभीकेअभी निकलो तो गाडी मील जायेंगी असे उद्गार काढले. इतक्यांत एक इंदूरहून इसम एकटाच बाबांना भेटावयास आला त्याचा स्वतंत्र टांगा होता व,येतां जातां २ रुपये ठरले होते. त्याला बाबांनी आमचेबरोबर जाण्यास हुकूम केला. आमचें टांग्याचें काम झालें. आम्ही स्टेशनवर पोहोंचतांच सायंकाळची गाडी चुकली. त्यामुळें रात्रीं मेल्ला आम्हांला यावें लागलें. आम्हीं कोपरगांवाहून ८।८॥ चे गाडीनें मेलचीच तिकिटें काढून मनमाडला आलों. तों असें समजलें कीं मेल भुसावळला कांहीं डिरेंजमेंट झाल्यामुळें तीन तास लेट झाली आहे. झालें दुसरे दिवसाचा ११ वाजण्याचा ऑफीसचा वेळ गाडीमध्येंच गेला. मेल सकाळीं ६।७ ला यावयाची ती १२ वाजतां दादरला आली. लखमीचंद ३।४ वाजतांच ऑफीसला गेला व मी त्या इंदूरच्या मित्राबरोबर सायनला येऊन स्नान वगैरे करून भोजन उरकून स्वस्थ पांच वाजतां वांद्रें मुकामीं आलों व दुसरे दिवशीं ऑफीसला गेलों. सदई मित्र हा माझा एल्फिन्स्टन हायस्कुलमधील सहाध्यायी होता. व शिर्डीपासून मुंबईस येण्यापर्यंतचा आमचा सर्व खर्च त्यानेंच केला. त्याचें घरदार सायन मुक्कामीं आहे व तो एका प्रसिद्ध दळवी फामिलींतील असून बॉंबे कस्टममध्यें नोकरीस असतो. त्यांचे घरीं गेल्यावर त्यांचें वृद्ध आजा आजी यांना मी हकीगत सांगितली. व केडगांवचे नारायण महाराजांचेकडे गेले होते असें मला त्याचवेळीं त्यांचे कडून समजलें. एकंदरींत १॥ रुपयाचे शिल्केंत मोठ्या ऐषआरामामध्यें आम्ही मुंबईस आलों. इकडे वसईकोर्टमध्यें एक नाझर होते. त्यांचें व आमचें फारच जुळत असे. कारण त्यांची दिशा व माझी दिशा हीं काठीच्या दोन टोंकाप्रमाणें होतीं. सदई नाझरनी Over. timeची परवानगी एक दिवस गैरहजर म्हणून कायद्याचीं पानें चाळून त्यावे

ळने सबजज्ज मि.कुपर यांचे कान भरले. सदर्हू इसम ७ दिवसांचे रजेवर गेला असून आज हजर होणें असतां गैरहजर राहिला आहे. तो बेपरवा आहे वगैरे वगैरे बऱ्याच गोष्टी सांगून त्यानें सबजज्जाचे कान फुंकले. मी आदले दिवशीं वसईस सायंकाळीं पोंचल्यावर ही हकीगत मला समजली व गांवांतही Overtime म्हणून जास्त दिवस गैरहजर राहिल्याबद्दल मागची नोकरी मोफत जाऊन नवी विटी नवा दांडू म्हणून नवीन आरंभ करावा लागेल अशा बऱ्याच गप्पा पसरल्या. मी तर बेफिकीरच होतों; परंतु सबजज्ज यांना माझा स्वभाव माहीत असल्यामुळें त्यांनीं त्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. दुसरे दिवशीं ११ वाजतां मी ऑफिसमध्यें जातांच आमची सावत्र सासू हजरच होती ती माझेबरोबरच चेंबरमध्यें आली. सबजज्जांनीं काल कां आलां नाहीं म्हणून विचारलें मी एकंदर सर्व हकीगत सांगितली. त्यांनीं तावडतोब १ दिवसाची एक्स्टेन्शन ग्रांट केली. धाकटी सासुबाई शरमली व तिची थोडी गांवांतील लोकांनीं फजितीही केली.

एकंदरींत "राजा चाले तेथें वैभव सांगाती" या तुकारामच्या उक्तीप्रमाणें प्रत्येक संताकडे चमत्कार असतातच परंतु चमत्काराच्या दृष्टीनेंच संतांची ओळख व पारख करणारांना त्यांचेपासून खरा आत्मिक उन्नतीचा लाभ फारसा मिळत नाहीं, असा माझा अनुभव आहे. चमत्कार हे केव्हां केव्हां कांहीं जनांना सन्मार्गाला लावण्यास कारणीभूत होतात हीही गोष्ट सत्य आहे परंतु अशांनीं आपलें धोरण कोणतें ठेवावें हेंही त्यांनीं संतसहवासावरून जाणलें पाहिजे.

## ॥ श्री साईनाथबाबा प्रसन्न ॥

ह. भ. प. रा. रा. रा. गोविंदराव रघुनाथराव दाभोळकर यांस:— मी आपला स्वतःचा अनुभव पाठवित आहें तो आपण सवडीनुसार श्री साईलीले मध्यें छापून प्रसिद्ध कराल अशी नम्र विनंती आहे कळावें.

आपला दास व बाबांचा दासानुदास शंकर गणपत शिंदे

माझा मावस भाऊ रा. रा. धोंडीबा फरताळे यांच्या घरीं श्री साई-नाथ बाबांची पूजा होती. तेव्हां आमच्या मावस भावानें आज आमच्याकडे श्रीसाईबाबांची पूजा आहे तेव्हां तुम्ही आज भजनास या असें सांगितलें. तेव्हां मी १० वाजतां भजनास गेलों व गुरुवारीं गुरुमूर्ती रा. रा. काशिनाथ मामा डुबे यांच्या बरोबर बरीच मंडळी भजनास आली होती व दुसऱ्या दिवशीं मी रा. रा. काशिनाथ मामांकडून श्रीसाईनाथ बाबांचा फोटो घेऊन पूजा करूं लागलों. ८-९ महिने पूजा केली. व पुढें पुजा करण्याचें सुटलें व पुढें २ वर्षांनीं मुंबईस शिवरात्रीच्या दिवशीं फोटो घेण्यांत आल्यामुळें मला फार त्रास होऊन माझ्या मनावर वाईट परि-णाम झाला. एक प्रकारें डोकें विचारानें भडकूं लागलें. पुढें ६ महिने पर्यंत तो विचार म्हणजे एक प्रकारची भीति वाटूं लागली व आम्ही पुष्कळ डॉक्टर यांचे उपाय केले परंतु कांहीं गुण आला नाहीं. पुढें विचाराचा फार त्रास होऊन माझें डोकें फार भडकूं लागलें. आमच्या आईनें म्हणावें कीं याला वेड लागलें. कोणी म्हण याला भूत लागलें. हजारो कल्पना निघूं लागल्या. पुढें माझी आई इतकी त्रासून गेली कीं आतां काय करावें. जेव-णास बसलों कीं तो विचार मनांत येई व जीव घाबरा होई. मला विचित्र भावना होऊं लागल्या. माझे मित्र. रा. रा. परब यांनीं मला असें सांगितलें कीं तुला असा त्रास होत असतो तर ज्या देवावर तुझी भक्ती असेल त्या देवाची पूजा कर म्हणजे हें सर्व तुझें जाईल व रात्रीं मी श्रीसाईबाबांची आठवण करूं लागलों. २-३ दिवसांनीं बाबांची पूजा केली व पुढें बाबांनीं दृष्टांत दिला. बाबा भिक्षेस निघालेले आहेत व मी त्यांच्याकडे सारखा

पाहात आहे. बाबा मला म्हणतात बेटा, कुछ मत डरो मै है. असे शब्द बाबा बोलले व सकाळीं आईस रात्रीचें स्वप्न सांगितलें तेव्हां आई म्हणाली कीं पूर्वी बाबांची पूजा करीत होतास व मध्यें सोडून दिलीस त्याचा हा प्रताप आहे; तरी अजून तूं आपली पूजा करूं लाग म्हणजे बाबा सर्व तुझें डोकें ठिकाणावर आणतील. मी पूजा करूं लागलों व गुरुवारीं गुरुमूर्ती रा. रा. काशिनाथ मामा डुबे यांच्याकडे गेलों व मामांस म्हणालों कीं मी आज तुमच्याकडे भजनास येणार आहें. तेव्हां मामांनी विचारलें कीं तूं तर सर्वच सोडून दिलें आहेस आणि मग तूं आज कसा भजनास येणार ? तेव्हां मी आपला श्री साईबाबांबद्दल अनुभव सांगितला. मला एक प्रकारें विचारानें त्रास होत असतो व २ दिवस झाले, मी बाबांची पूजा केली आहे व मी आडमार्गी गेलों होतों. तेव्हां बाबांनी मला त्रासांतून वांचविलें आहे व बाबांच्या उदीपासून पुढें मला चांगलें बरें वाटूं लागलें व पुढें तो विचार मनांत आला कीं मी श्रीसाईबाबांस मोठ्यानें हांका मारीत असें. तोंच ताबडतोब विचार निघून जाऊन मला बरें वाटे. मी. रा. रा. काशिनाथ मामा डुबे यांच्याकडून श्रीसाईबाबांची उदी आणली व पूजा करून लावीत असें. पुढें २ महिन्यांनी माझा विचार कमी होत गेल्यामुळें मला बरें वाटूं लागलें व पुढें मी श्रीसाईबाबांचे समाधीचें दर्शन घेतलें व बाबाचे अनुभव पावलोंपावलीं येत आहेत. मी. श्रीसाईबाबांस पाहिलें नाहीं तरी जगामध्यें श्रीसाईबाबांचे अनुभव पावलो पावलीं येत आहेत. कारण बाबाच्या आरतींत म्हटलें आहे कीं (नास्तिकांनाही तूं लाविसी निज भजनी दाविसी नाना लीळा असंख्यरूपांनी) हे बरोबर पटत आहे.

गेल्या पुण्यतिथीला व गुरुपौर्णिमेच्या उत्सवांत प्रसिद्ध भजनकार रा. रा. विठ्ठलराव बाळकृष्ण कल्याणपूरकर यांनीं रा. रा. दाजी विठ्ठल ढोबारे यांच्या येथें केलेलें प्रवचन व पुराण.

॥ मंगलाचरणम् ॥

ब्रह्मानंदं परमसुखदं केवळं ज्ञानमूर्तिम् ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादि लक्ष्यम् ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षिभूतम् ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ १ ॥

प्रथम नमन माझें, सद्गुरू साईनाथा ।
हरुनि दुरित माझें, मागतों हेंचि आतां ।
अशिव कलि मला तो, गांजितो नित्य नाथा ।
तुजविण नच त्राता, दीन या कृष्णनाथा ॥ २ ॥

गळा रुंडमाळा, करीं वाम झोळी ।
मला वाटतें कीं, असे चंद्रमौळी ।
नका अंत पाहूं, तुम्ही साइनाथा ।
दावी मुमुक्षु पथ हा, मज कृष्णनाथा ॥ ३ ॥

हें चालिलें वय वृथा, भुललों प्रपंचीं ।
तीं ही करोनि स्थिरता न घडे मनाची ।
दुःखार्णवांत बुडतों, मज तारि आतां ।
नमस्कार माझा, सद्गुरू साईनाथा ॥ ४ ॥

॥ ध्यानपर ॥

॥ श्लोक ॥

श्रीसाई यत्प्रसादें, रमणिय अशि ही मूर्ति सन्मूख ठेली ।
वाटे पश्चीम देशीं, स्वमठ करुनियां, देवता स्थापियेली ॥

भक्तांच्या पुरवाया, सकलहि मनिषा, वाट पाहे कृपेनें ।
तो साई हनुमान भय भरुनी, पाहूं चला दृष्टीनें ॥ १ ॥

॥ अभंग ॥

चला शिरडी जाऊं । डोळे भरुनी बाबा पाहूं ॥ १ ॥
घेतां समाधीचें दर्शन । सहज हरुनी जाय शीण ॥ २ ॥
जमा होती समाधीपार्शीं । हिंदु यवन पारशी ॥ ३ ॥
तेथें कैंचा भेद भाव । सर्वां भूतीं सांई देव ॥ ४ ॥
सर्व धर्म एक झाले । सांईबाबा पायीं ठेले ॥ ५ ॥
उद्धराया पतीत जन । केलें शिरडीग्रामीं ठाण ॥ ६ ॥
शिवसुत गजानन । म्हणे तया मी शरण ॥ ७ ॥

॥ श्लोक ॥

हरुनि सकल तापा, सौख्य द्याया जिवांसी ।
निकट तटिं उभा जो, पारला ग्रामवासी ।
सुरुचिर रमणी ही, मूर्ती ती पाहण्याला ।
निशिदिनिं मन घेवो, तेथ ही धावण्याला ॥ १ ॥

॥ अभंग ॥

आला विजया दशमी दिन । जाऊं चला शिरडी जन ॥ १ ॥
बाबांची पुण्यतिथी । भावें भक्तजन करिती ॥ २ ॥
कलियुगींचें साधन । साईबाबांचे चरण ॥ ३ ॥
आदी नाथ साई मूर्ती । बदले श्रीराम मारुती ॥ ४ ॥
उद्धरोया जडजीव । आला शिरडीं रमाधव ॥ ५ ॥
गजानन म्हणे वंदूं । साईनाथ दीनबंधू ॥ ६ ॥

॥ अभंग ॥

आम्हा लाधलें निधान । सांई बाबांचे चरण ॥ १ ॥
आदीनाथाचा अवतार । सांईनाथ गुरु दातार ॥ २ ॥
काय सांगों अधिकार । चारी मुक्तींचे माहेर ॥ ३ ॥
धरुनी यवन आकार । शिरडीं आला कृपलावर ॥ ४ ॥
साई नोहे व्यक्ति सहान । पायीं लीन गजानन ॥ ५ ॥

॥ पद ॥

साई बने दत्त महाराज, जो पूर्ण करे दीन काज ॥ धृ० ॥
तीन शीर षड् भुजा विराजे, कटि कौपिन गळे माला ।
अलख करके नाथ सदनकू आया उदुंबरवाला ॥ साई० १ ॥
बकरेकी लिई मुंडि हातमें, टपकत है खुन उसका ।
चार वेद वो श्वान बने है पार न लागत जिनका ॥ साई० २ ॥
हात पसरके ठाडे द्वार मो लावो निवाले बच्चा ।
दास गणू कहे यही कलीमो तारक वो प्रभु सच्चा ॥ ३ ॥ साई० ॥

॥ भजन ॥

साईनाथ साईनाथ । गुरु दत्त दिगंबर साईनाथ ॥

॥ गुणवर्णनम् ॥

॥ श्लोक ॥

आहे योगी शीरडी ग्रामवासी ।
साईबाबा ज्ञान वैराग्य राशी ॥
साक्षित्वानें लक्षितांना निवृत्ति ।
आनंदानें आदरी जो प्रवृत्ति ॥ १ ॥

॥ अभंग ॥

क्षमा शांतीयुक्त भवाब्धीचें जहाज। ऐसा सद्गुरुराज शिर्डीमाजी ॥१॥
नामाविधा ज्याची शोभे बाबा साई। अनाथांची माई तीच जाण॥२॥
अनाथ सनाथ हा भेद जेथें । सूर्य प्रकाशातें निवड कैंची ॥ ३ ॥
माझा गुरुराज जान्हवीचें जळ। गणू अर्पी भाळ तया पायीं ॥ ४ ॥

॥ अभंग ॥

शिव विष्णू ब्रह्मरूप बाबासाई। भाव दुजा कांहीं मानूं नका ॥ १ ॥
सद्गुरुरायाच्या पायाची जी धूळ। तेंच गंगाजळ शुद्ध माना ॥ २ ॥
अमृतां आगळीं मुखीचीं वचनें। तींच माना मनें गीता जेवीं ॥ ३ ॥
गणु म्हणे बाबा वसंत सोज्वळ। भक्तांनों कोकीळ व्हारे तुम्ही ॥४॥

॥ अभंग ॥

शुक सनकादि नारद अंबरीष। निवृत्ति ज्ञानेश नामा तुका ॥ १ ॥
दास तुळसी चोखा जयदेव सांवता। पंत नाथ मेहता कबीर तो ॥२॥
बोधला पवार विसोबा खेचर। गोरोबा कुंभार कूर्म दास ॥ ३ ॥
गणु म्हणे त्याच कोटींतला साई। चला त्याच्या पायीं लीन होऊं॥४॥

॥ अभंग ॥

जरी त्या संतांच्या मूर्ती हो लोपल्या। साईरूपें उरल्या पहावया॥१॥
त्रिभुवना माजी जे जे कोणी संत। ते ते साईनाथ मजलागीं ॥ २ ॥
भेदबुद्धी नुपजो माझी संतांठायीं। संत शेषशाई प्रत्यक्षची ॥ ३ ॥
गणुदास आहे संतांचा अंकीत। भेटो पंढरिनाथ त्यांच्या कृपें ॥४॥

॥ अभंग ॥

भक्तिरूप गंगा वाहे जयाठायीं। तेथें माझा साई राहे उभा ॥ १ ॥
हस्तसंकेतानें पालवितो लोकां। या हो फिरूं नका रानोमाळ ॥२॥

मज ओळखावें आहें मी कोठला । कशासाठीं आलां शिरडीसी ॥३॥
पंढरी क्षेत्रींचा मीज हो वाटाड्या । गणूच्या त्या उड्या साईबळें॥४॥

॥ पद ॥

( चालः—आरती भुवन सुंदराची )

वर्णितां थकलि वाणि देवी । स्वरूपा अशा वर्णु केवीं ॥धृ०॥ उत्सव थोर मनीं झाला । जैसा माय बघुनि बाला ॥ सुमाळा देहवृक्ष आला । अर्पितों भक्तीच्या या फुला ॥ चाल ॥ साईनाथा; तव रे बोध । त्यानें शोधित केला क्रोध । तैसा षड्रिपुंचाही शोध । होऊनि, मनि नच येई विरोध ॥ चाल ॥ तव ते पाय । हीच मम माय । तरुनि मज नेय । ह्मणूनि मी गाय । कीर्ति बरवी । सौमित्रनुति आयकावी ॥ १ ॥

॥ श्लोक ॥

असे साधु देही असूनी विदेही ।
जनीं बोलती ज्या महाराज साई ।
करी वृष्टि पीयूष दृष्टी सदाही ।
जगीं धन्य ऐसा महाराज साई ॥ १ ॥

॥ पद ॥

( चालः—हळु ग हळु आला याचा० )

हाचि सद्गुरु सद्गुरु साईनाथ । सच्चिदानंद मूर्तिमंत ॥ धृ० ॥ देह मी नसे । असे न मी व्यक्त । बोलिला गीतीं भगवंत ॥ मूढ परि वदती । वदती त्या व्यक्त । दिसे हा संसारीं सक्त ॥ वदुनी ते फसती । फसती मायेंत । मोक्ष त्यांजवळि कधि न येत ॥ बोध बोधाया । बाधा तनु धरित ॥ सच्चिदानंद मूर्तिमंत ॥ १ ॥ बघुनि आतुरता । आतुरता भक्ताची । काढिली देहबुद्धि त्याची ॥ लाविती भक्ति । भक्त

देवाची । दत्त श्रीकृष्ण रामयाची ॥ कुणासी देती । देति मंत्र गुप्त ॥ स०॥ २ ॥ बसुनि शिलधींत । शिलधींत भक्त तारी । सकल नर-नारी व्यसन वारी ॥ असा हा नाथ । नाथ सदाचारी । असे भक्तांचा कैवारी ॥ धावुनी भेटे । भेटे तो त्वरित ॥ सच्चिदानंद० ॥ ३ ॥ जसा हा स्वामी । स्वामी शिलधींत । तसा तो सकल विश्वभरित ॥ स्वात्म शक्तीनें । शक्तीनें फिरत । स्वरुप दावुनी करित पुनित ॥ कृष्णदासाला । दासा मधु पुरित ॥ सच्चिदानंद मूर्तिमंत ॥ ४ ॥

॥ श्लोक ॥ अनुष्टुप् ॥

साइनाथ इति ख्यातः । साइराजस्तथैवच ।
साइबाबेति विज्ञातः । सार्थ नामत्रयं गुरोः ॥ १ ॥

अर्थः—महाराजानां कोणी साइनाथ म्हणतात. कोणी त्यांस साई-राज असें म्हणतात व कोणी साइबाबा असें ह्मणतात. सद्गुरूंचीं ( महारा-जांचीं ) तिन्ही नांवें अर्थपूर्ण आहेत म्ह०. अन्यर्थक आहेत.

॥ श्लोक ॥ मंदाक्रांता ॥

मंदाकिन्याः कमिव विशदं यस्य पादारविंदात् ।
मंदं मंदं मधुर मकरंदं स्रुतं स्वादुगन्धम् ।
भक्त्या चास्वादितमतिमुदा साधुवृन्दैर्मिलिंदैः ।
वंदे साइं तमचलपदं सच्चिदानंदकंदम् ॥ १ ॥

अर्थः—ज्यांच्या पदकमलापासून भागिरथीच्या पाण्याप्रमाणे स्वच्छ व ज्यांस गोड सुवास येत आहे असा, हळुहळु मधुर मद गळतो आहे व ज्याचा स्वाद भक्तीनें व परम आनंदानें संतरूपी भ्रमर घेत आहेत, त्या अढळपद व सत्ताचैतन्य व आनंद यांचा गड्डा असे जे साइ त्यांस मी वंदन करतों.

॥ श्लोक ॥ इंद्रवज्रा ॥

सार्वज्ञ इष्टदः साई । नाधिजन्याश्च नाशकः ।
साइनाथ इतिख्यातः । अत एव महीतळे ॥ १ ॥

अर्थः—बाबा सर्व जाणणारे, इष्ट देणारे प्रत्यक्ष ब्रह्मदेव व ( भव ) भयाचे नाश करणारे म्हणून त्यांस या धरणीतळावर साइनाथ असें म्हणतात.

॥ श्लोक ॥ इंद्रवज्रा ॥

साक्षात्स इन्दिराकान्तः । रामोऽयं जानकीश्वरः ।
अतः स साइराजेति । विज्ञातो मेदिनी तले ॥ २ ॥

अर्थः—बाबा प्रत्यक्ष इंदिराकांत विष्णू व जानकीरमण प्रभु राम आहेत, म्हणून त्यांस या जगतितळावर साईराजा असें म्हणतात.

॥ श्लोक ॥ इंद्रवज्रा ॥

साम्बः इस ईश्वरः साई । बाबा वै बालबान्धवः ॥
अतः स साइबावेति । विश्रुतो भूमिमण्डले ॥ ३ ॥

अर्थः—बाबा हे प्रत्यक्ष शंकर परमात्मा व अज्ञान दीनबन्धू आहेत म्हणून त्यांस या भूमंडलावर साईबाबा असें म्हणतात.

॥ श्लोक ॥ शार्दूलविक्रीडित ॥

लक्ष्मी चूरित पादपद्म स्वकरें जेथें मुनी तिष्ठती ।
ब्रह्मानंद मिळावया स्वरूप जें योगी सदा चिंतिती ।
कोणी सेविती धूम्र कोणी करिती अष्टांग हीं साधनें ।
साईरूप धरीत भक्तहृदिचें फेडावया पारणें ॥ १ ॥

॥ मालिनी ॥

हलहल हृदिं ठेवी भस्मचर्चीत अंगा ।
विलसत शशि भाळीं मस्तकीं दिव्य गंगा ।

स्वरूपें निज सदां जो राही तल्लीन बाबा ।
धरित स्वरूप साई पाहुनी भक्तभावा ॥ २ ॥

॥ भुजंगप्रयात ॥

भृगूकारणें देव साकार झाला ।
हृदीं लाथ साहोनि वंदी भृगूला ।
जनी कारणें कांडितो देवराया ।
धरी साईरूपा करी दूर माया ॥ ३ ॥

॥ वसंततिलका ॥

सारथ्य अर्जुनरथीं करि अश्वसेवा ।
जो रुक्मिणी हृदयिंचा बहुमोल ठेवा ।
जो गोकुळीं अधरिं वाजवि गोड पावा ।
तो शेरडी मधि धरी प्रभु "साई" नांवा ॥ ४ ॥
रेड्यामुखीं वदवि जो विभु वेद चारी ।
जो नंदमंदिरिं सुखें हरि गाइ चारी ।
नामा जया वदनिं घालित भक्ति घासा ।
गोदातटीं पुरवि तो प्रभु भक्त आशा ॥ ५ ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

प्रल्हादास्तव स्तंभिं जो प्रगटला मारावया दुर्जनां ।
घेई मोहिनिरूप दैत्य वधिला दावीत लीला जनां ।
दामाजीस्तव घोंगडी धरि शिरीं जासूद हा सांवळा ।
प्रार्थी देवसुता हरी भवभया साई प्रिया प्रेमला ॥ ६ ॥

॥ पद ॥

शिरडीग्रामीं सद्गुरुस्वामी साईनाथ महाराज । दीनांचें पुरवीतसे काज ॥ धृ० ॥ भक्तासाठीं धांवत येती शिरडी ग्रामाला । लीला

चरित्रें करुनी दाविलीं अगाधास जगीं गमल्या ॥ शिरडी० ॥ १ ॥ एके दिवशीं प्रातःकाळीं नवलचि देखिलें । पाव गव्हाचें घर भरुनी सुपीं हो काढीलें ॥ दळण मांडिलें पीठ काढिलें । टाकिलें ओढ्याकाठीं ॥ तेथुनी महामारीही गेली । समर्थलीला उकली ॥ शिरडी० ॥ २ ॥ औरंगाबादीं धुपखेडे गांवीं चांद पाटील । घोडा हरवला वाटेंत तेव्हां झाले दिलगीर ॥ खांदा खोगिर वाट चालती हाक मारिली बाबानें ॥ चिलीम भरोनी चिमटा रोवुनी निखारे काढीले त्यानें ॥ पाणी नाहीं सटका आपटीला पाणी काढिलें ॥ चमत्कार ऐसा करुनी चिलीम ओढिली दोघांनीं ॥ शिरडी०॥ ३ ॥ दीपोत्सवाची हौस मोठी, साई समर्थांसी ॥ नित्य आणिती तेल मागुनी दीपोत्सव करिती ॥ कंटाळले वाणी एक दिवशीं तेल नाहीं म्हणती ॥ निमुटपणें मशिदींत येउनी, नवलचि हो करिती ॥ अल्प होतें तेल टमरेलीं, पाणी टाकिती ॥ दोन्ही एके ठिकाणीं करुनी, प्राशन हो करिती ॥ हातीं टमरेल पाणी भरुनी, पंत्यांसी घालिती॥ पेटविल्या पंत्या तेल नसुनी, रात्रभर जळती ॥ शिरडी० ॥ ४ ॥

॥ आर्या ॥

स्फुरलें मानस येथें, वर्णाया गूण साई बाबांचे ।
सद्गुरु कृष्णकृपेनें, बोलो रसना सदैव ते वाचे ॥ १ ॥
वदवी श्रीकृष्णगुरु, स्थिर चर व्यापक अखंड सुखकारी ।
सहकारी संसारीं, भवभयछेदक दयाब्धि अघहारी ॥ २ ॥

॥ पद ॥ ( राम स्मरावा राम० या० चा० ) ॥

सदय हृदय तूं दयाळ । साइ बाप । सदय तूं दयाळ ॥ ध्रु० ॥
शिरडी ग्रामीं अवतरुनी करी, दीन भक्त प्रतिपाळ ॥ सांइबाप ॥१॥
भक्तकाज कल्पद्रुम स्वामी, असती पड्रिपुकाळ ॥ साई० ॥ २ ॥

नमिती जे तुज अनन्य भावें, गळुनि हंकृति त्याळ ॥ सा० ॥ ३ ॥
मुक्त करिशि त्यां दर्शनमात्रें, स्वानुभवें तत्काळ ॥ सा० ॥ ४ ॥
राव रंक समसमान तुजला, अभेद तूं सर्वकाळ ॥ सा० ॥ ५ ॥ कृष्ण
गुरुकृपें नमतां सदया, कृष्ण हृदयीं तूं अढळ ॥ साइ नाथ ॥ ६ ॥

॥ भजन ॥

## ॥ नामपर ॥

॥ श्लोक ॥ पृथ्वी ॥

त्वदीय किल सद्गुरो सुरस निम्न नामार्णवः।
नभीः सलिल सेवने नहि निमज्जनं नाशकृत्।
त्वदङ्घ्रिसुनिमग्नधीः भवति धाविताहंकृतिः।
पुनश्च ननु विंदते मधुरमुक्तिमुक्ताफलम् ॥ १ ॥

अर्थः--हे सद्गुरो, खरोखरच आपला नामसमुद्र पिण्याला गोड व पोहण्याला खोल आहे. त्याचें पाणी प्याल्यापासून (कारण तें खारट नाहीं) बिलकुल भय नाहीं. तसेंच त्यांत बुडण्यापासून खात्रीनें नाश होत नाहीं. (इतकेंच नव्हे तर) आपल्या सागरांत जो खूप बुडून राहील त्याच्या (देह) अहंकाराचें (मल) क्षालन होतें, व त्याशिवाय त्यास खात्रीनें मधुर मुक्तिरूपी मौक्तिक फल उपभोगास मिळतें.

॥ पद ॥ मूर्तिमंत भीति या चा० ॥

संत साईनाम मुखीं, प्रेमभरें गातसा। उत्कंठित व्हा तुम्ही, मग उशीर कायसा ॥ नाम तें करील चित्त, शुद्ध जेविं आरसा ॥ कृपासिंधु दीनबंधु तुज दिसेल राजसा ॥ रोमगुढी उभारती, हर्षमान कृपणसां ॥संत॥१॥ ब्रह्मानंदीं चित्त हारपे, प्रपंच होय असारसा ॥ ह्याचा बोची श्रोत्र वदन, ऐकवील श्रुतिरसा। कर्मातीत व्हाल म्हणी,

मुक्तभाव नाहींसा ॥ सद्गुरूनी ऐसी कृपा, ध्याता ध्येय समरसा ।
मूढ हिरा नामरूप, मिथ्या भास मृगांबुसा ॥ संत साई० ॥ १ ॥

॥ आर्या ॥

जो नर मानवदेहीं, स्मरण करी नित्य गुरुपदाब्जाचें ।
दैव सहाय तयाला, पुण्य खरें तें अनंत जन्मांचें ॥ १ ॥
सद्गुरुसद्बोधाचें, चिंतन मनिं जो पुनः पुन्हा करितो ।
त्यातें भवतरणाला, साधन गुरु तो स्वयेंचि दाखवितो ॥ २ ॥

॥ पद ॥ चाल–श्रीगुरुचे चरणकंज ॥

सद्गुरुतें नित्यकाळ प्रेमें तूंचि ध्याई ॥ प्रेमें तूंचि ध्याई, प्रेमें तूंचि ध्याई ॥ध्रु०॥ अंतरिं तूं साइ धरीं । नामामृत पान करीं । इतर पंथा दूर सारी । भावे त्यासीं गाईऽऽ ॥ १ ॥ नेम व्रतां सोडुं नको। इतर साधु निंदु नको । अहंभाव धरूं नको । हीच भाक येईऽऽ ॥२॥ उद्धवेश तुज विनवी । गुरुपदीं भाव ठेवी । सर्वकाळ गाई ओवी । नित्य स्मरत जाई ॥ ३ ॥

॥ पद ॥ राम स्मरावा या चा० ॥

गुरुचरणामृतपान । सदोदित । गुरुचरण।० ॥ ध्रु० ॥
पापतापा शमवी निशिदिनिं । स्वर्गपथ सोपान ॥ १ ॥
भव रोगांतक महा औषधा । मुख्य हेंच अनुपान ॥ २ ॥
अघतम समूळ नाश कराया । अचूक शरसंधान ॥ ३ ॥
रामकृष्णादिक अवतारा । होतें गुरुपद ध्यान ॥ ४ ॥
निळकंठाचे भाळीं लिहिलें । साई गजानन गान ॥ ५ ॥

॥ भजन ॥

साइनाथ साइनाथ । भजरे मानस साइनाथ ॥

## उपदेशपर

॥ पद ॥

साईनाथ मना स्मर दिन रजनी ॥ धृ० ॥ वास जयाचा शिरडी ग्रामीं । परंतु असती स्थिरचर व्यापुनी । अनुभव घ्यावा आपुलाले मनीं । जय जय जय साईनाथ मना० ॥ १ ॥ रूप जयांचें येतां ध्यानीं । मन हें येई किति करि दाबुनी । चरण धरावे धांवत जाउनी । जय जय जय साई ॥ २ ॥ पातक नाशक नाम जयाचें । ध्यातां गातां आवडी साचें । चुकतिल फेरे चौऱ्यांशींचे । जय जय जय साईनाथ मना० ॥ ३ ॥

॥ पद ॥ वंजाराचे चालीवर ॥

तुज शांति हवी जरि कांहीं । धरि साईनाथ पद हृदयीं ॥धृ॥ तूं मानव जन्मा येसी । नित पशुसम कर्म करिसी ॥ रे ॥ या देह सुखाचे विषयीं ॥ या देह० ॥ धरि सा० ॥ १ ॥ संसारीं सुख अति थोडें । दुःखाचे डोंगर गाढे ॥ रे ॥ मरसी त्या डोंगर पायीं ॥ मर० ॥धरि ॥२॥ सद्भक्त हरी घाबरला । दुःखाचा पडतां घाला रे ॥ तो शरण रिघाला साई ॥ तो श० ॥ धरि० ॥ ३ ॥ श्री रामायण भावार्थ । धरुनियां नाथ भक्तार्थ रे ॥ तूं वाच म्हणे हें कांहीं ॥ तूं वा० ॥ धरि सा० ॥ ४ ॥ पति करितां दुःखित तारा । समजावी रघुकुल तारा रे ॥ हा बोध म्हणे तूं पाही हा बोध० ॥ धरि० ॥ ५ ॥ ऐसा हा सद्गुरुराणा । न च स्वकिय भक्त करि दैना रे ॥ अनुभव हा कृष्णही पाही ॥ अनु० ॥ धरि साइना० ॥ ६ ॥

॥ पद ॥ राम स्मरावा या चा० ॥

साईनाथ पदीं लीन । सदोदित । साईनाथ ॥ धृ ० ॥ धन्य शिरडी परब्रह्म वसे त्या । गाऊं कशी मति हीन सदोदित ॥ साईनाथ पदी लीन ॥ १ ॥ साधु चरित्रें गातां थकले । संत सन कादीक

सदोदित ॥ सांई ॥ २ ॥ देवि सारस्वति वास जिव्हाग्रीं । कविनर मी मति हीन ॥ सदोदित ॥ ३ ॥ कांहीं असो मी मम प्रभूनें । हृदयिं धरुनि गाईन ॥ सदोदित ॥ सांईनाथ पदीं ० ॥ ४ ॥

॥ पद ॥

सांईनाथांसीं पाहूं जाऊं चला शिरडी । झडकरी जाऊं चला शिरडी ॥ धृ० ॥ ध्यास तयांचा लागला चित्ता । नाहीं सुचत कांहीं॥ झडकरी० ॥ १ ॥ कोपरगांवीं तांगा करुनी । न्हाऊं गोदातीरीं ॥ झडकरी० ॥ २ ॥ आनंदानें दर्शन घेऊं । लीन तत्पदीं होऊं ॥ झड० ॥ ३ ॥ हेतु मनींचे पुरवितील ते । भाव ठेवुं पायीं ॥ झडकरी० ॥ ४ ॥ मन हें धांवत स्वस्थन राहत । काय करूं पाही ॥ झडकरि० ॥ ५ ॥

॥ पद ॥ सुखकर कर साधूचा या चा० ॥

धरिसि जरी सांई चरणिं विश्वास ॥ धृ० ॥ मायामय हा भवनिधि तरुनी, पुरशिल तत्पदिं खास ॥ धरिसि० ॥ १ ॥ निदिध्यास अनुदिनीं धरिसि जरि, पावसि ब्रह्मपदास ॥ धरिसि० ॥ २ ॥ सांई अनुभव दुर्लभ बापा । जा बघ त्या वंशास ॥ धरिसि ॥ ३ ॥ धांवत धांवत जा जा झडकरी । घट्ट धरीं चरणास ॥ धरिसि० ॥ ४ ॥ उत्तम हा नरजन्म नराचा, व्यर्थ करूं नको त्यास ॥ धरिसि० ॥५॥ कृष्ण कृपान्वित कृष्ण दिनाच्या, दवडुं नको वचनास ॥ धरिसि० ॥ ६ ॥

॥ पद ॥

( प्रभु अखंड सुखमय रामचि हा या चा० )

प्रिय सांई सुखद पद सोडुं नका । नका भुलूं आप्त सुत धन कनका ॥ धृ० ॥ साई चरण करि हरण पापनिधि । लक्षि धरी ही खूण । त्यजुनि विकल्पा जाण । सांई करिं आप्त सखा ॥ प्रि० ॥१॥ साई संत महंत नरा रे । घे अनुभवें तूं प्रचीत । हो येथें सावचित् ।

मोहुं नको या माया काका ॥ २ ॥ दक्ष होउनि पदिं लक्ष लाविनां । मोक्ष तूज प्रत्यक्ष । साक्षि लाविं तूं अक्ष । नको करूं वैखरी नं हि फुका ॥ प्रिय० ॥ ३ ॥

॥ पद ॥

नजर भर देखो । नजर भर देखो । कछु खरच नहिरे । मुफत नाम चाखो ॥ध्रृ०॥ हैं कुई ऐसा ये दुनियामों । जाकर बोले बात । देखो बाबा गोदा किनारे । उनसे जोरो हात॥ नजरभर ॥१॥ वो ही मुरशद वोही मौला । वोही बना है पीर । आब कांहा पकरू निमाज राजा वोही भरा भरपूर ॥ नजरभर० ॥ २ ॥ जंगल जाना उसके खातर । सोहि भरा दीलमों । अल्ला, मौला, राम, रहिम । दोनो भरा तनमो ॥ नजरभर० ॥ ३ ॥ गुरुदास कहे सुनो भाई यो । विरला जाने मनभो । भाव भगतसे साई खडा है । देखो जाके शिरडीमों॥४

॥ पद ॥ राम स्मरावा राम या० चा० ॥

सद्गुरु चरणीं ध्यास । धरावा । सद्गुरु चरणी० ॥ ध्रृ० ॥
सद्गुरुमूर्ती निशिदिनिं चिंतन । हाच सदा अभ्यास ॥ १ ॥
सांईनाथ पद चिंतन घडलें । श्रीहरी दीक्षित यांस ॥ २ ॥
साईनाथ पद तारक झालें । उपासनी संतास ॥ ३ ॥
सांईनाथ गुरु सार्थकता दे । हरे राम मंत्रास ॥ ४ ॥
साईलीला तर्खड वाणितीं । करून सदा सायास ॥ ५ ॥
मुकुंदात्मज वैभव त्यागुनी । धरि साईगुरु सहवास ॥ ६ ॥
सांई गजानन निळकंठाच्या । पावतील नवसास ॥ ७ ॥

॥ भजन ॥

साइनाथ साइनाथ । भजरे मानस साईनाथ ॥

## ॥ करुणापर ॥

### ॥ पद ॥

साई रहम नजर करना । बच्चोंका पालन करना ॥ साई ॥ धृ० ॥
जाना तुमने जगत् पसारा । सबही झूट जमाना ॥ साई० ॥ १ ॥
मै अंधा हूं बंदा आपका । मुझसे प्रभू दिखलाना ॥ साई० ॥ २ ॥
दास गनू कहे अब क्या बोलूं । थक गई मेरी रसना ॥ ३ ॥

### ॥ पद ॥

रहम नजर करो अब मेरे साई । तुम बीन नहीं मुझे मा बाप भाई ॥ रहम ॥ धृ० ॥ खाली जमाना मैने गमाया । साथी आखरका किया न कोई ॥ रहम ॥१ ॥ मैं अंधा हूं बंदा तुमारा । मैना जानूं अल्लाईलाही ॥ २ ॥ अपने मसीदका झाडू गनू है । मालिक हमारा । तुम बाबा साई ॥ रहम ॥ ३ ॥

### ॥ पद ॥ गजल ताल ॥

साईनाथा तुझे पायीं । ठेवितों दीन मी माथा ॥ धृ० ॥
गुणातीता निराकारा । प्रभो देवा निर्विकारा ॥
नसुनि तुजला काज धरिसी । मनुजरूपा दीनानाथा ॥ १ ॥
कर्म करणें अवश्यकता । नसे तुजला गुरूराया ॥
जगदोद्धार तरी करिसी । सुलभ सांगूनियां गाथा ॥ २ ॥
चतुर्विध हेतु धरूनियां । भक्त तुजला शरण येती ॥
सकळ इच्छा पूर्ण करिसी । वरद कर ठेवुनी माथा ॥ ३ ॥

सगुणरूपा धरुनि लीला । किती करिसी नसे पार ॥
कृष्ण तव हा दास देवा । कसा वर्णील ती आतां ॥ ४ ॥

॥ पद ॥

जगीं नाहीं तुजविण कोणी जगपाला साई रे ॥ मत्तापा वारीं रे । भवभय पाशा तोडी रे ॥ ध्रु० ॥ भवसागरीं मी ही नौका नावाडी तूंचि रे ॥ काळजी वाही रे मम नौका ही तारी रे ॥ गणु छात्राचा ह्सवा रे । धरिसी मनी तूं जरीं थोडा रे । जवरी करुनि तव धरिन चरण ममहरण करिन दुरिता सारे ॥ जगीं नाहीं० ॥ १ ॥

॥ पद ॥

दाखवीं तव दिव्य पाय-या० चा० ॥

साई साई योगीराज । धांव पाव मातें ॥
रंक हीन दासी तुझी । ध्याई त्वत्पदातें ॥ ध्रु० ॥
अंत किती पाहासी बा । वारी आपदातें ।
अजामील पिंगळेसी । तारियेळें नाथें ॥ १ ॥
भंगवेन काय अहा । मदिय अघनगातें ।
देव गुरु साई दत्त । देई दर्शनातें ॥ २ ॥
स्फूर्ती आणि प्रेम देई । तव कीर्तनातें ।
साई सुता आर्जविही । त्यजुनी जनातें ॥ ३ ॥

॥ पद ॥

असे ब्रह्मरूप साईनाथ माझा गुरुवर । परी दुजा वाटे दैदीप्यमान दनकर ॥ धृ० ॥ गाणार वाजवीणार साई प्रियकर । तसा ऐकणार

असे तोचि साच गुरुवर ॥ असे० ॥ १ ॥ करि धरुनि पवित्र तंबुरा गाई सुस्वर । परि मध्यें कसा रे नाकळे होतो बद सूर ॥ असे० ॥ २ ॥ नको देऊं किमपि बदसुरा ढात्र गुरु माई । वा साई ॥ किती वानुं तुजसी मी पापि अति रे पामर । गुण छात्र विनवि मम दुजा भाव करि दूर ॥ असे० ॥ ३ ॥

## ॥ नित्यपाठ ॥ अष्टक ॥

नमो साईनाथ नमो दीनबंधो । यशैश्वर्य वैराग्य श्रीधर्मसिंधो । नमो ज्ञानमूर्ते नमो ब्रह्मरूपा । नमो सद्गुरो शांतमूर्ते अरूपा ॥ १ ॥ नमो निष्क्रिया निर्गुणा निर्विकारा । किती पाहसी माझिया दुर्विकारा । मला तूं न होसी सख्या साह्य दाता । अशा पामरा कोण तारील ताता ॥ २ ॥ तुवां भेटण्या लाविला काळ फार । नको ह्या पुढें घोर संसार भार । किती दीन होऊं किती क्लेश साहूं । कधीं सौख्य देसी किती वाट पाहूं ॥ ३ ॥ लखोबा निमित्तें तुझा दास दीन । कृपापात्र हा जाहला तेविं लीन । तुझ्या पादयुग्मीं तरी स्वीकृतातें । त्वरेनें सख्या धाडि हो सत्पदातें ॥ ४ ॥ पदा सोडण्या काय मी हो न लाजे । सुखें आड येवो सदा कर्म माझें । मला व्यर्थ चिंता तयाची किमर्थ । तयाला निवाराावया तूं समर्थ ॥ ५ ॥ "समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ।" समर्थोक्ति ही काय मिथ्या म्हणावी । तुझी योग्यता अल्प कोणी गणावी ॥ ६ ॥ मला मुक्तिचें भाग्य देतां तुला रे । किती कायसे कष्ट होणार वा रे । तुला योग्य वाटे तसें दास्य घेई । स्वधामा मला शीघ्र धाडूनि देई ॥ ७ ॥ तुझ्या पादयुग्माविणें अन्य थारा । असेना मला काय सांगूं उदारा । जसा होतसे जीवनावीण मीन । निळोबा तसा त्वत्प्रसादार्थ दीन ॥ ८ ॥

॥ पद ॥ पंच तुंड नर रुंड माल धर ॥

श्रीगुरुराया तव चरणा या भाळ ठेवितों नयना या ।
तोडुनियां परमाया बंधन मुक्त कराऽखिल जीवा या ॥ ध्रु० ॥

साधन नुरलें स्वाधिन कांहीं सुखी जीव होईल कसा ।
साधु संतजन चिंता करिती भारतभूजन ताराया ॥ १ ॥

ईश्वर तूं अव्यक्त वस्तु तूं भुवनत्रय चालक साई ।
ईक्षण करिसी स्वस्थ बसुनि ही भक्तव्यसन निवाराया ॥ २ ॥

नानापरिचे क्लेश भोगिती सोडिती गुरुकुल अभिमान ।
नास्तिक जन हे व्यसनीं पडतां येती शरण तुझे पायां ॥ ३ ॥

थरथर कांपति दुर्जन बघुनी त्वदुग्रमूर्तीसी नाथ ।
थकतां येती शरण तुला ते क्षमाऽपराजय मागाया ॥ ४ ॥

साइनाथ गुरुचरण तरण भवसिंधु कृपाऽवनकर हरसा ।
साधन विरहितही तुज नमितों कृष्णदास कर जोडुनिया ॥ ५ ॥

॥ आर्या ॥

श्रीगुरुराया ताता, सांभाळी शामदास हा तनय ।
त्वत्पदिं ठेवुनि माथा, प्रार्थितसे प्राप्त हो मला विनय ॥ १ ॥

सांडून लोभ मोहा, लावियले सत्पथास या जन जे ।
बाळा, गोविंद, हरी, बापू, श्रीकाशिनाथ तुजसि भजे ॥ २ ॥

ईशा तव लीलेला, वर्णाया भक्तिपंथ गणु लागे ।
नच पूर्तता तयाला, वर्णन करण्यास तोंहि या आगे ॥ ३ ॥

नाना मार्गीं जातां, दाविंयलें रूप विविध जातीचें ।
पटलें ज्यांना नच त्या, बोधियलें सत्स्वरूप मग साचें ॥ ४ ॥

श्रद्धेनें, सत्यानें नाम तुझें नित्य घेति जे वदनीं ।
योगक्षेम तयांचे वाहुनि तूं राखसी तयां सदनीं ॥ ५ ॥

बालकरामा धामा, हिंडविलें सत्य देव बघण्याला ।
फिरफिरुनि श्रांत झाला, आला परतून शिरडि ग्रामाला ॥ ६ ॥

बाबा अगाध लीला, वर्णाया उद्धवेश वा थकला ।
तन, मन, तुझेंचि धन हें, सर्व परीनें तुलाच हा विकला ॥ ७ ॥

ऋषिसंख्या या आर्या, आर्यांचे चरणकमलिं अर्पितसे ।
अल्पारंभ असे हा, यति, मात्रा, वृत्त बोध मजशि नसे ॥ ८ ॥

श्रीसाइनाथ चरणीं, अल्पहि करणी करीतसें हजर ।
सर्वत्र दोष त्यागुनि, बुधजनिं द्यावीच इजकडे नजर ॥ ९ ॥

॥ पद ॥ जरि मद्भक्त दुराचारी ॥

हे पूर्णब्रह्म सुखधाम ज्ञानसागरा । गुरुराया हो मजविषयीं रोष न धरा ॥ धृ० ॥ ना तुला कधीं स्पर्शला क्रोध आजवरी । तूं साई क्षमेची मूर्ति साच भूवरी ॥ मागुति धरुनि अवतार जान्हवी तीरीं । केलीस कृपा त्या परिक्षितीच्या वरी ॥ रंभा ती नाचली पुढें थयथया जरी । ना विकल्प चढला तुझिया चित्तावरी ॥ हें असे विदित सकलांस कशाला जरा । बोलणें तोचि तूं शुकाचार्य न खरा ॥ १ ॥ तो तूंच पुढें गंगेंत शिंपल्यामधें । अवतार

घेतला कबीर म्हणती बुधे ॥ संतार्थ वधू ओपिली शार्ङ्गपाणी । बसविला विणाया शालु जानकीपती ॥ चरचरा पुत्र कापिला आपुल्या हातीं । पाहतां प्रबंधा संत तुझ्या डोळनीं ॥ ठेवितां देह तो कळंद माजला जरा । तयीं तूंच दाविलीं फुलें करुनि धीवरा ॥ २ ॥ पुनरपि सुवाटे मती लावण्या जगा । आळस साई होऊनि फसवि ना उगा ॥ पाण्यांत लाविले दिवे तेल ना मुळीं । टांगिली जुन्या चिंध्यांनीं निजाया फळी ॥ पेटतां खळें भक्तांचे आग विझविली । वांझेस करुनियां कृपा संतती दिली ॥ किती अगाध या तव लीला वानु गुरुवरा । मौनेंच जोडुनी कर पदीं ठेविन शिरा ॥ ३ ॥ मी पापी पतित आगळा दोषसागरु । तुजवीण कुणाचें स्मरण समर्था करूं ॥ गौतमी ओघ तृषितास दूर कां धरी । कां शशी रुसुन बैसेल चकोरावरी ॥ कां काय जमिन ओझ्यास बघुनि भय धरी । वा अग्नि बघुनि गवतास पळतसे दुरी ॥ हें सर्व तुम्हीं जाणूनि मनीं गुरुवरा । या दासगणूच्या शिरीं अभयकर धरा ॥ ४ ॥

॥ श्लोक ॥ पृथ्वी ॥

मदीय जननी भवान् जनक बंधु वर्गो भवान् ।
मदीय सुहृदो भवान् सुभग शांतकांतो भवान् ।
मदीय मखिलं भवान् सदय साइनाथ प्रभो ।
भवत्पदरजो विना नहि परं न जाने नहि ॥ १ ॥

॥ पद ॥

सुजन विबुध नर साई । समर्थां निज पदीं द्या ठावा ॥ धृ० ॥
अनंत मी अपराधी बुडतों सत्पथ मज दावा ॥ १ ॥ चाल ॥

तव साई, चरणाची, मज घडवी या सेवा । दास गणूचा लीन
छात्र हा निजकर शिरीं ठेवा ॥ २ ॥

॥ श्लोक ॥ पृथ्वी छंद ॥

किती विनवुं मी तरी अझुनि कां दया येईना ।
प्रभो तुजविणें मला जगतिं कोणिही अन्य ना ।
पतीत खल मी परी, वधुं नको दयाळा उणें
आम्ही न जरि पापि, पावन तुला न कोणी म्हणे ॥ १ ॥
तुवां अमित पातक्यांस दिधली गति उत्तमा ।
मलाच मग कां उपेक्षिसि प्रभो निवारी तमा ।
झणीं करिसि साचती प्रभु त्वदीय ब्रीदावली ।
भवीं तुजसि आर्त बाहति, तयांस तूं माउली ॥ २ ॥

॥ पद ॥

त्वरित पदरीं घे साई । ठायीं, करुं कायी, मज नाहीं, भो तुज-
विण रे गुरुमाई ॥ धृ० ॥ संकट नाशक नाम तुझें हें ।
ऐकुनियां बहु आनंदची मज होई ॥ १ ॥ चरणरजातें सेऊनियां
हा । दास गणूचा छात्र लीन तव पायीं ॥ २ ॥

॥ भजन ॥

साईनाथ गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ॥

॥ धांवा ॥

॥ पद ॥ अहारे कृष्णा मुकुंदा या० चा० ॥

येई येई साईनाथा । दे दर्शन मज झडकरिं आतां ॥ धृ० ॥
मन धांवलें चरणीं । म्हणुनी स्मरिला तुज मी स्मरणीं ॥
पवित्र शिरडी तरणी । केलि महा अधिकारि महंता ॥ १ ॥

भक्त तुझे गुण गाती । नांनापरि जगीं नाचति ख्याती ॥
ऐसी सकलिक ख्याती । जहाली क्षणमात्रें अवनीता ॥ २ ॥

संत दयाळ तुम्ही हो । आर्त पुरवा मज दर्शन द्याहो ॥
या या या या, या हो । वाडेवीं तुज पाहिन आतां ॥ ३ ॥

॥ पद ॥ जाते की मम० या० चा० ॥

भेटसि कधिं तूं सांई बावा मज या मोहमयीं ।
त्वत्तनु कांति अवलोकाया आस सदा हृदयीं ॥ धृ० ॥
जरि मी तुझा असें दयाळा, तरि धावुनि येई ।
क्षणभरि तरि तव तनु दावीं रे, येउनियां समयीं ॥ १ ॥
भक्तकाम कल्पद्रुम तुह्मां, वदति ठायीं ठायीं ।
भेद अभेदा रहित तुह्मांना, राव रंक कांहीं ॥ २ ॥
साच असे ग्रह एकवार तुज, बघण्या त्या कायीं ।
येईं धांउनी या मोहमयीं, कृष्णदास अन्वयीं ॥ ३ ॥

## ॥ अंजनी गीत ॥

प्रिय दीक्षित तुम्ही कृपा करुनियां कळवा मम बावांसी विनया । मन्मानस बघण्या तव काया । आतुर बहु झालें ॥ १ ॥ जरि मी देखें सदैव तुजला । परि वेडें मन घेइं भ्रमाला । अक्ष धांवती बघण्या तुजला । या या झडकरिं हो ॥ २ ॥ तव चरणांवरि टेविन माथा । सखया माझ्या सांईनाथा । मनिं आणुनियां साइ समर्था । या या झडकरि हो ॥ ३ ॥ गोर गरिब दुर्बळ बहु येथें । पाहती सांई तव मार्गातें । कृपा करुनियां मुंबापुरितें । या या झडकरिं हो ॥ ४ ॥ हें जग तुमचें तुम्हीं जगाचे । न

तुम्हां थारें आपपराचें । कनवाळू तुम्ही अखिल जगाचे । या या झडकरिं हो ॥ ५ ॥ प्रिय दीक्षित ही कित्र मम कळवा । प्रिय सांईचें मन तुम्हीं वळवा । तळमळ माझ्या मनिची निवटा । नमन तुम्हां पायीं ॥ ६ ॥

॥ साकी ॥

अंतर माझें जरि तव चरणीं सत्प्रिय साईनाथा ।
एकवार तरि येउनि येथें, भेट देईं अनाथा ॥
अंतर साक्षी तूं । मग कां येंसि न धांवुनि तूं ॥ १ ॥

॥ श्लोक ॥ अनुष्टुप् ॥

लक्ष कोटी दोष माझे, सांई बापा, क्षमा करा ।
दास मी विनवी तुझा जोडुनी उभया करा ॥ १ ॥

मी माझें लिहिणें नाहीं, दयाळा कृष्ण सद्गुरू ।
लिहिता लिहविता तूं, दास हा तव किंकरु ॥ २ ॥

॥ पद ॥ रघुवीरें पूजिले ॥

दर्शन दे साइबाबा । सकल दुरित मम हरुनि त्वरित दर्शन ० ॥ धृ० ॥ काम मोह मद लोभ थरथरां । कांपति तुज पाहुनि नटवरा । तुझिया चरणिं रिपु करिती नमन ॥ दर्शन ० ॥ १ ॥ त्वदिय समुहीं मी पापि म्हणून । नाम तुजसि लाधलें पतितपावन । मग अभंग चरणिं न्यायाया करिना कसर ॥ २ ॥ अज्ञ तुझें लेकरूं ना कदा । टाकी भवीं: भो घेई तव पदा । सतत तुजसीं गणू छात्र शरण ॥ दर्शन ० ॥ ३ ॥

॥ पद ॥ तिळगुळ घ्या गंजुळ या० चा० ॥

घ्या दर्शन या मूडेला ॥ साईबा ॥ धृ० ॥ नर तनु ही मम
फुकटचि गेली । साधु पदें मी नाहीं वंदिलीं ।
आयुष्याची घटका भरली । हा जन्म ही व्यर्थचि गेला ॥ सा० ॥ १ ॥
शिरडी ग्रामीं वसती तुमची । ऐकत आलें बहु दिवसांची ।
आस असे बहु दर्शनाची । न्या झडकरिं तव पदकमला ॥ सा० ॥ २ ॥
नामीं तुमच्या चित्तची नाहीं । प्रपंचाची सुटली घाई ।
कृपा करावी तुम्हि लवलाही । अशी आस असे बहु मजला ॥ सा० ॥३॥
अविश्वासू मन हें झालें । निश्चयाचें बल तें गेलें ।
भव सागरिं या डुंबत राहिलें । ही बरी न दिसे गत मजला ॥ ४ ॥
दर्शन तुमचें होईल केव्हां । सुटलीसे तळमळ मम जीवा ।
भेटीलागीं धांवा धांवा । वाट पाहे दीन ही कमला ॥ साईबा० ॥५॥

॥ आर्या ॥

सुखकर दर्शन देई, सदय हृदय स्वामि साईबाबा हो ॥ रुतलों
या भवपंकीं, ने विलया साहि साई बाबा हो ॥ १ ॥

॥ पद ॥ रामा मजला या० चा० ॥

साई माते धांवत येई उचल तुझ्या बाळिला ॥ धृ० ॥
वघ अंगे ही चिखलें भरली । नाकीं तोंडीं धूळ जहाली ।
तुज म्हणती हे लेंकुरवाळी । हंसतिल जन हे तुला ॥ १ ॥
पायां मध्यें शक्ति न पाहीं । बोल बोबडे उमटत नाहीं ।
काय हवें तें नकळे आई । रडुनी जीव दमला ॥ २ ॥

जिवाचा हो अट्टाहास । सांग कुणाची करणें आस ।
जन ह्मणती तुज माता दक्ष । मग कां हें योग्य तुला ॥ ३ ॥

अंगडें टोपी गेली कोठें । नाकीं तोंडीं शेंबुड लोटे ।
जग हंसतें हें तुज उफराटें । लाज न त्याची मला ॥ ४ ॥

पुत्राचें तें कौतुक करसी । कन्या ह्मणुनी का अवगणसी ।
मातृस्नेहा काय विसरसी । योग्यचि हें कां तुला ॥ ५ ॥

लोक ह्मणति हे कन्या कोण । कोण कुणाची अशी कां दीन ।
काय असे हें माता मन । लांछन हें ना मला ॥ ६ ॥

॥ भजन ॥

साईनाथ गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ।
मजला ठाव द्यावा पायीं । येउनि माझ्या हृदयीं राहीं ॥ १ ॥

## स्थितिपर.

॥ अभंग ॥

नाहीं कुठें गेला, हृदयीं वसला । वाटतें मजला बाबा साई ॥ १ ॥
जागृत ठेवितो मज ठायीं ठायीं । अनेक उपायीं गुरु माझा ॥ २ ॥
दीनाचा दयाळु ऐसा नाहीं कोणी । तनु झिजवोनी गुप्त झाला ॥ ३ ॥
आतां नाहीं भय उरलें या जीवा ॥ दासीचा विसांवा सद्गुरु तो ॥४॥

॥ पद ॥

साई दर्शना जावें ऐसा विचार ही मन्मनी । नसतां नेलें मज खेंचुनी ॥ धृ० ॥ शिरडी ग्रामीं, नाना काका ह्या उभयां प्रेरुनी । कृपा ही बहुतचि वाटे मनीं ॥ १ ॥ संशय छेदुनि मनिंचे सारे निज स्वरुपा दावुनी । घेतलें निजपदिं मज ठेवुनी ॥ २ ॥ संत दर्शनें

पूर्वीं झालीं होतीं त्यांचें फळ । मिळालें आतां नव नव फळ ॥ ३ ॥ तव आज्ञेनें तव भक्तांची सेवा घडली बरी । निवृत्ति समजुनि बहु चाकरी ॥ ४ ॥ उपकृत होसी म्हणुनी सख्या सुदाम्यासि तो हरी । तैसा गमसी मम अंतरीं ॥ ५ ॥ उदारता ही कैसी वर्णू निवर्तते वैखरी । न दिसे कोठें तुजसी सरी ॥ ६ ॥ पतीत पावन ब्रीद तुला बा यथार्थ साजे बरें । काय तें वर्णावें पामरें ॥ ७ ॥ नीलकंठ हा तव पदिं राहो अखंड ऐसा वरा । दयाळा देईं निज किंकरा ॥ ८ ॥

## ॥ अभंग ॥

आहों तैसे राहूँ आह्मी सर्वकाळीं । तो साई सांभाळी आह्मांप्रती ॥ १ ॥ नाहीं दुसऱ्याचें आह्मां कांहीं काम । साईनें निष्काम केलें आह्मां ॥ २ ॥ निष्काम होऊनि साधुं आत्मतुष्टि । भुक्ति मुक्ति मुष्टीं आह्मां मग ॥ ३ ॥ आमुची मुमुक्षा पूर्ण करी साई । इतर तो देई काय आह्मां ॥ ४ ॥ राजे आणि रंक आह्मा सर्व सम लौकिकी तो काम नाहीं आह्मां ॥ ५ ॥ लौकिकी संपदा ख्याती सर्व जन । त्यां तृणासमान मानूं आह्मी ॥ ६ ॥ प्रारब्धें हा देह तो कैसाही राहो । त्याकडे न पाहों आम्हीं आतां ॥ ७ ॥ आमुचें तें काम एका साईपाशीं । आह्मीं इतरांसी नहों लीन ॥ ८ ॥ साईच्या आधारें मत्त झालों आम्हीं । विषयांची ऊर्मी मावळली ॥ ९ ॥ परोपकाराचा काम तोही क्षीण । साई इच्छेवीण घडेना तो ॥ १० ॥ त्यामाजी अहंता ती आह्मांसि नाहीं । घडवितो साई तेंचि घडे ॥ ११ ॥ माझी सहस्र धी तिळा परकर्मी । अथवा अकर्मी योजी साई ॥ १२ ॥ स्थूल सूक्ष्म देहें जीं जीं होतीं कर्में । तीं सारीं अकर्म साई करी ॥ १३ ॥ आम्हास तों एका साईपायीं

आस। तेथें सदा वास आम्ही करूं ॥ १४ ॥ सर्वेश्वर गुरु हा
मनीं निर्धार। आम्हा सर्वाधार साइनाथ ॥ १५ ॥ एका साईवरी
टाकूं आम्हीं भार। स्वसुख दातार तोचि आम्हां ॥ १६ ॥ साई
कृपा करी नीलकंठावरी। तो निज अंतरीं शांत झाला ॥ १७ ॥

॥ भजन ॥

## जागणें

॥ श्लोक ॥ मंदाक्रांता ॥

जेथें तेथें दिससि मजला सद्गुरो सिद्ध साई।
नाहीं नाहीं तुजविण दुजी दृश्य भावास आई॥
अंबे येई पदरिं तव हा बाळ लावी स्तनाला।
स्वानंदाचें मधुर पय दे, शांतवी ताप जाला ॥ १ ॥

॥ शार्दूलविक्रीडीत ॥

संसारीं दृढ निश्चया न ढळुं दे त्याचीच ख्याती खरी।
सप्रेमें भजतां विवेक पदरीं बांधील तो श्रीहरी ॥
सन्मार्गीं वळवो कुमार्ग टळवो साई स्वताच्या करीं।
नाथाचीच कृपा निरंतर असो तुम्हां सुभक्तांवरी ॥ २ ॥
नुरली भक्तिविणेंच अन्य मनिषा, हा बोधहोवो मना।
भक्ति प्रेमविणेंहि ज्ञान नलगे, हे तो जडो भावना ॥
ज्ञानानें अभिमान नित्यचि नवा, तो आड येईल कीं।
भक्ति प्रेमहि एक वस्तुच असे, जी सौख्य देईल कीं ॥ ३ ॥

## मालिनी

नमन करित भावें साई पादांबुजाला।
आवडि तुझि सदा दे वासुदेवात्मजाला॥
वदत सतत हें मी भक्ति तूझी करावी।
सकल त्यजुनि भावें कांस तूझी धरावी ॥ ४ ॥

॥ केकावली ॥

प्रसन्न वदनें पहा, प्रभु जराहि, दीनाकडे ।
दयाब्धि तुम्हि हो असा, सतत हाचि डंका झडे ॥
असें सतत ऐकतां, दुरि कराल, या पामरा ।
प्रभो, मग नसे मला, जगिं दुजा खरा आसरा ॥ ५ ॥

॥ अभंग ॥

मन इच्छी हेंची नित्य तुझी सेवा । शिरडीवासी देवा साईबाबा ॥ १ ॥ कारण जे झालें जन उद्धराया । आठवूं त्या पायां दिवानिशीं ॥ २ ॥ नेत्रा लागो चाळा पहावें तुझें ध्यान । रंगावें हें मन भजनामाजी ॥ ३ ॥ लागो नित्य ध्यास तुझिया नामाचा । आणिक हे वाचा कांहीं न वदों ॥ ४ ॥ गजानन म्हणे ठेविलासे माथा । सद्गुरु साईनाथा पायांवरीं ॥ ५ ॥

॥ भजन ॥

साईनाथ गुरु माझे आई ।
मजला ठाव द्यावा पायीं ॥

## निर्धार

॥ पद ॥

देह जावो अथवा राहो श्रीगुरुपदीं माझा पूर्णची भावो ॥ ध्रु० ॥ सदानंद सुखदायक गुरुला, प्रेमभावें पूजिन त्याला ॥ १ ॥ पुजूनी त्यासी हृदयीं सांठविलें, निजरूपीं मन गुंगची झालें ॥ २ ॥ त्या पूर्णब्रह्मा हृदयीं सांठवितां; सहजची मुक्ती मिळेचि तत्वतां ॥ ३ ॥ दास म्हणे त्या गुरुपदासी, अहो रात्र स्मरणा लावीन मनासी ॥ ४ ॥

॥ भजन ॥

साईनाथ गुरु माझे आई ।
छंद लागो तुझिये पायीं ॥

## पूजोपचार.

॥ मानसपूजा ॥

॥ श्लोक ॥ भुजंगप्रयात ॥

मनीं आणुनी ध्यान हें सद्गुरूचें ।
दिलें स्थान त्या चित्त सिंहासनाचें ।
पदीं अर्घ्य हें प्रेमवारीमनानें ।
दिलें कल्पुनी घेतलें सद्गुरूनें ॥ १ ॥

दिलें चूळ टाकावया वारि हस्तीं ।
पुढें बैसवीली गुरुज्ञान मूर्ती ।
तनू मर्दिली सर्व पंचामृतानें ।
पुढें घातलें स्नान शुद्धोदकानें ॥ २ ॥

॥ मालिनी ॥

उदरिं जग जयाचें वस्त्र त्या नेसावीलें ।
विमल गुरु कपाळीं गंध हें लावियेलें ।
उपवित गुरुकंठीं घालुनीयां विधीनें ।
परिमळयुत पुष्पें अर्पिलीं आदरानें ॥ ३ ॥

॥ इंद्रवज्रा ॥

नाना परीचे वसनादिकांनीं ।
आच्छादुनी आणिक भूषणांनीं ।
शृङ्गारुनी श्रीगुरुदेव मूर्ती ।
आपाद ती देखिली कामपूर्ती ॥ ४ ॥

तेव्हां पुढें पाकरसामृताला ।
ठेवोनियां सद्गुरु जेववीला ।
केलें सुखें भोजन सद्गुरुनें ।
पाणी दिलें आचमना मनानें ॥ ५ ॥

॥ आर्या ॥

दिधला त्रयोदशगुणी तांबुल मग प्रेमयुक्त गुरुपाणीं ।
देतां वरदकरें गुरु चढवी शिष्यास भक्तियुत पाणी ॥ ६ ॥
झाला कृतार्थ गुरुचे वरदकरें शिष्य तोषुनि स्तवन ।
थकला वेद तयाचें बाळत्वें करि करोनियां नमन ॥ ७ ॥

आरत्या.

जाऊं चला आरतीला । नमुया श्रीगुरु सांईपदाला ॥ जाऊं० ॥ धृ ० ॥ जन हे येती पूजन करिती सुमनहार ते गळां घालिती । मस्तक साईपदीं नमविती ॥ करुनी प्रार्थनेला । घेउनी जाती प्रसादाला ॥ जाऊं ॥ १ ॥ हळू हळू बोलती भाषा घाटी उकले ज्याची त्याला गांठी । इतरां वाटती फोलची गोष्टी । मम चित्त भ्रम हरला । पाहुनी सांई सत्स्वरुपाला ॥ जा० च० आ० ॥ २ आला मेघा करुं ह्या आरती । छत्र रुप्याचें धरुं सांई वरतीं । उभे भालदार चवरी ढाळिती । तास झणाणे ऐका । जयजय जय गुरु सांई विलोका ॥ जा० ॥ ३ ॥

## ॥ आरती ॥

( आरती भुवन सुंदराची या० चा० )

आरती करिनें गुरुवर्या । सच्चिदानंद साई सदया ॥ धृ० ॥ मेघं धरिशि दिना हृदया । सकल मतिमल तूं नेशि विलया ॥ कालसम दुष्टां दंडाया । पातला भक्तां सुखवाया ॥ अहा तूं ज्ञान मूर्ति तेजा । दिन मणि उदय पावे दूजा ॥ चाल ॥ वेदश्रुतिसार । उघडुनी द्वार । ज्ञान भांडार । सुजना दावाया । येशि जगीं जडमुढ ताराया ॥ १ ॥ घेउनी सद्वंशीं जनन । केलें द्वैताचें हनन ॥ मुमुक्षां दावि आत्मसदन । भवाब्धीतारक तव चरण ॥ चाल ॥ भक्त परिवार । यात्रेचा भार । शोभे महाद्वार । साई बोधसुधा प्याया । तत्पर असती सिद्ध ठायां ॥ २ ॥ जाळिले सलिलाचे दीप । दाविली खळां भक्ति अमुप ॥ जळतां प्रचंड तृणराशी । आज्ञापिलें इंधनासी ॥ घेउनि वैराग्याची सदसी । जर्जर करि जो षडरीशीं ॥ अतर्क्यचि झाला निगमासीं हरीहर वंदित हो ज्यासीं ॥ सांई योगी मुकुट मणी । ध्याते "हिरा" दीन रजनीं ॥ ३ ॥

## ॥ आरती ॥

जयजयाजि महाराज जय जय गुरुबाबा साई ॥
परब्रह्म अवतार तूं या शतकाच्या ठाई ॥ जय० ॥ धृ०
साई साई वदतां वाचे अघ अवघें विलया ।
जाई ऐसा प्रभाव तव कीं हे सद्गुरु राया ।
नाहीं शक्ती मजला किमपी तव गुण वानाया ।
भाव धरुनी मात्र आलों शरण तुझ्या पाया ॥ ज० ॥ १ ॥

हीन दीन मी पातकि मोठा तसाच अज्ञानी ।
म्हणुन समर्था देइ न मजला कदापि लोटोनी ।
आधिभौतिक आध्यात्मिक तैशीं आधिदैविक जाणी ।
दुःख संकटें वारि समर्था कृपाकटाक्षांनीं ॥ ज० ॥ २ ॥
शुकाचार्य तूं होउन मागें भागवत कथियेलें ।
नामामृत तें कबीर होऊन जगता पाजियलें ।
शिर्डित येऊन श्रम निरसाया तैल जला केलें ।
द्वय अंगुष्ठीं गंगा यमुना तीर्था दाखविलें ॥ ज० ॥ ३ ॥
भावें चरणीं तव नत होतां अघटित तें घडतें ।
गांठीं असल्या दुष्कृत तैंची सुकृत झणी होतें ।
सूर्यागमनें जसें निशीला दिवसरूप येतें ।
दास गणू हा सदैव घाली तुह्मांस दंडवत तें ॥ ज० ४ ॥

## ॥ आरती ॥

भ्रमला हा जीव आतां कोणा ओवाळूं । विश्वीं भरुनी उरला माझा नाथ कृपाळू ॥ धृ० ॥ मी गेलों सद्गुरुनाथ राउळीं । राउळ निमालें मीच माझी माउळी ॥ १ ॥ आरती हातीं घेउनि ठेलों उभा सामोरी । अंतर्दृष्टी पाहें नाथ मज माझारी ॥ २ ॥ सोहं ज्योती उजळोनी आरती केली । बोधप्रभेमाजी प्रगटे साई माउली ॥ ३ ॥ गुरुचरणीं विश्वास धरोनि बाळ चालला । साई चरणीं समरस होउनि मुक्तचि झाला ॥ भ्रमला० ॥ ४ ॥

## ॥ आरती ॥

आरती साईबाबा । सौख्यदातारा जीवा । चरणरजातळीं । निज-दासां विसावा भक्तां विसावा ॥धृ०॥ जाळुनी या अनंग । स्वस्वरूपीं राहे दंग । मुमुक्षु जना दावी । निज डोळां श्रीरंग ॥१॥ जया मनीं जैसा भाव । तया तैसा अनुभव । दाविसि दयाघना । ऐसी तुझी ही माव ॥२॥ तुमचें नाम ध्यातां । हरे संसृतिव्यथा । अगाध तव करणी मार्ग दाविसी अनाथा ॥ ३ ॥ कलियुगीं अवतार । सगुण ब्रह्म साचार । अवतीर्ण झालासे । स्वामि दत्त दिगंबर ॥ ४ ॥ आठां दिवसां गुरु-वारीं । भक्त करिती वारी । प्रभुपद पहावया । भवभय निवारी ॥५॥ माझा निज द्रव्यठेवा । तव चरणरज सेवा । मागणें हेंचि आतां । तुम्हां देवाधिदेवा ॥ ६ ॥ इच्छित दीन चातक । निर्मल तोय निज-सूख । पाजावे माधवा या । सांभाळ आपुली ही भाक ॥७॥

## उपसंहार.

घालिन लोटांगण वंदीन चरण । डोळ्यांनीं पाहिन रूप तुझें । प्रेमें आलिंगिन आनंदें पूजिन । भावें ओवाळिन म्हणे नामा ॥१॥ त्वमेव माता पिता त्वमेव । त्वमेव बंधुः सखा त्वमेव । त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देव देव ॥ २ ॥ कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा । बुध्यात्मना वाऽनुसृतस्वभावात् । करोमि यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयामि ॥ ३ ॥ अच्युतं केशवं राम नारायणं । कृष्ण दामोदरं वासुदेवं भजे ॥ श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं । जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥ ४ ॥ हरि-नारायण दुरितनिवारण परमानंद सदाशिव शंकर । भक्तजनप्रिय पंकज-लोचन तव दासोऽहम् ॥ ५ ॥

॥ भजन ॥

साईनाथ गुरु माझे आई।
मजला ठाव द्यावा पायीं॥

## श्रीसांईनाथ महिम्नस्तोत्र.

सदा सत्स्वरूपं चिदानंदकंदं, जगत्संभव स्थानसंहार हेतुम्। स्व भक्तेच्छया मानुषं दर्शयंतं; नमामीश्वरं सद्गुरुं सांइनाथम्॥ १॥ भवध्वांत विध्वंस मार्तंडमीड्यं, मनोवागतीतं मुनिध्यानगम्यम्। जगद्व्यापकं निर्मलं निर्गुणं त्वां, नमामीश्वरं ०॥२॥ भवांभोधिमग्नार्दितानां जनानां, स्वपादा-श्रितानां स्वभक्तिप्रियाणाम्। समुद्धारणार्थं कलौ संभवंतं, नमामी-श्वरं ०॥३॥ सदानिंबवृक्षस्य मूलाधिवासात्सुधास्राविणं तिक्तमप्यप्रियं तम्। तरुं कल्पवृक्षाधिकं साधयंतं ॥ न ०॥४॥ सदा कल्पवृक्षस्य-तस्याधिमूले, भवद्भावबुद्ध्या सपर्यादिसेवाम्। नृणां कुर्वतां भुक्तिमुक्तिप्रदं तं॥ नमामी ०॥५॥ अनेकाश्रुतातर्क्यलीला विलासे, स मा विष्कृते ज्ञानभास्वत् प्रभावम्। अहंभावहीनं प्रसन्नात्मभावं, नमामी ०॥६॥ सतां विश्रमाराममेवाभिरामं, सदासज्जनैः संस्तुतं सन्नमद्भिः। जनामोददं भक्तभद्रप्रदं तं, नमामीश्वरं ०॥७॥ अजन्माद्यमेकं परंब्रम्ह साक्षात्स्वयं संभवं राममेवावतीर्णम्। भवद्दर्शनात्संपुनीतः प्रभोऽहं, नमामी ०॥८॥ श्रीसाईश कृपानिधेऽखिलनृणां, सर्वार्थसिद्धिप्रद। युष्मत्पाद रजप्रभावम-तुलं, धातापि वक्ताक्षमः। सद्भक्त्या शरणं कृतांजलिपुटः संप्रापितोऽस्मि प्रभो। श्रीमत्सांई परेशपाद कमलान्नान्यच्छरण्यं मम॥९॥ सांइरूपधर राघवोत्तमं, भक्तकामविबुधद्रुमं प्रभुम्। माययोपहत चित्तशुद्धये, चिंतया-म्यहमहर्निशं मुदा॥१०॥ शरत्सुधांशु प्रतिमप्रकाशं, कृपातपत्रं तव सांइनाथ। त्वदीयपादाब्जसमाश्रितानां, स्वच्छायया तापमपाकरोतु॥११॥

उपासनादैवत सांइनाथ, स्तोत्रैर्मयोपासनिना स्तुतस्त्वम्। रमेन्मनो मे तव पादयुग्मे, भृंगो यथाब्जे मकरंदलुब्धः ॥ १२ ॥ अनेक जन्मार्जित-पापसंक्षयो, भवेद्भवत्पादसरोजदर्शनात् । अमस्व सर्वानपराधपुंजका-प्रसीद सांईश, गुरो दयानिधे ॥ १३ ॥ श्रीसांइनाथ चरणामृतपूर्णचित्ता-स्तत्पादसेवनरताः सततं च भक्त्या संसारजन्य दुरितौघ विनिर्गतास्ते, कैवल्यधाम परमंसमवाप्नुवंति ॥ १४ ॥ स्तोत्रमेतत्पठेद्भक्त्या यो नरस्त-न्मनाः सदा । सद्गुरोः सांईनाथस्य कृपापात्रं भवेद् ध्रुवम् ॥१५॥ सांईनाथ-कृपास्वर्द्रुः सत्पद्यकुसुमावलिः। श्रेयसे च मनः शुद्ध्यै प्रेमसूत्रेण गुंफिताः ॥ १६ ॥ गोविंद सूरि पुत्रेण काशिनाथा भिधायिना । उपासनीत्युपाख्येन श्री सांइ गुरवेर्पिता ॥ १७ ॥ इति श्री सांइनाथ महिम्न स्तोत्रं संपूर्णम् ॥

## —वंदन नमनाष्टकम्—

### प्रहर्षिणी

विघ्नेशं गजवदनं गणेशसाइम् ।
क्रीडन्तं विविधविलास नृत्यगीतैः ।
वाग्देव्याऽमृतमधु विद्यया च सार्धम् ।
वंदे त्वां स्मितमुख शारदासमेतम् ॥ १ ॥

### ॥ उपजाति ॥

परावरं सद्गुरु दत्तराजम् । ज्ञानेश्वरं सद्गुरुमाधिराजम् ।
उमावरं सद्गुरुसाइराजम् । कैवल्यदं राजगणं नमामि ॥ २ ॥

### ॥ रथोद्धता ॥

दत्तपादकमलं कमनीयम् । ज्ञानराज सुपदं रमणीयम् ।
साइनाथचरणं स्मरणीयम् । पूजये त्रिपदमादरणीयम् ॥ ३ ॥

## शार्दूलविक्रीडितम्.

संसार श्रमतप्त शांतिसखे मित्राय तुभ्यं नमः ।
सद्भक्त्या जगदात्मने च रवये नित्यं नमस्ते नमः ।
तेजःपुंजखगोल शीर्षमणये सूर्याय तुभ्यं नमः ।
लावण्योदधि मानवे भगवते नित्यं नमस्ते नमः ॥ ४ ॥

चिद्रत्नाय खगाय संविहरते दिव्यांबरे ते नमः ।
पूष्णे पुष्टिविवर्धकाय जगतो नित्यं नमस्ते नमः ।
विद्युत्कांति हिरण्यगर्भ विभवे रम्याय तुभ्यं नमः ।
आनंदाय मरीचिने च शिरसा नित्यं नमस्ते नमः ॥ ५ ॥

आदित्याय नमोऽस्तु तेजर्निधये धीशाय तुभ्यं नमः ।
लीलावृद्धि विकासकाय खलु ते नित्यं सवित्रे नमः ।
अर्कायास्तु नमो नमो द्युतिमते श्रीशाय तुभ्यं नमः ।
चिद्ज्ञानोदयकारकाय च नमः श्री भास्करायास्तु ते ॥ ६ ॥

साष्टांग प्रणिपात पुष्पस्त्रगियं भक्त्यार्पिता ते मया ।
प्रीत्या स्वीकुरु नाथ तामनुदिनं योगेश्वर त्राहि माम् ।
श्रीसाईशचिदात्म दत्तगुरवे भूयः पुनस्ते नमः ।
भूयश्चापि पुनर्नमोस्तु शतशः भूयो नमस्ते नमः ॥ ७ ॥

## मंदाक्रान्ता

मंदाकिन्याः कमिव विशदं यस्य पादारविंदात् ।
मंदं मंदं मधुर मकरंदं स्रुतं स्वादुगन्धम् ।
भक्त्या चास्वादितमतिमुदा साधुवृंदै र्मिलिंदैः ।
वंदे साइं तमचलपदं सच्चिदानंदकंदम् ॥ ८ ॥

इति श्री साइनाथवंदननमनाष्टकं संपूर्णम्.

## प्रार्थना

हे स्वामिन् त्वरितमपावृणु प्रसीद।
भांडारं तव करुणाघनस्य पुण्यम्।
संभृत्येश्वर मम धीपुटं धनेन।
सस्नेहं परिहर धीश बुद्धिदैन्यम् ॥ १ ॥

## धन्यता

### ॥ वसंततिलका ॥

( गुरुपौर्णिमेच्या वेळचें )

ही पौर्णिमा परमपुण्यतिथी विलोकीं।
सच्छिष्य सद्गुरुस भेटति सर्व लोकीं।
किंवा करोनि परमोत्सव तद्गुणातें।
गाती, मनांत धरुनी बहु आदरातें ॥ १ ॥

साई उदार गुरु ते मजला मिळाले।
अज्ञान तें हृदयिंचें बहु नष्ट झालें।
मद्भाग्य थोर म्हणुनी गमतें मनाला।
तो धन्य जो निरखि सत्य तदुत्सवाला ॥ २ ॥

### ॥ पद ॥

( पुण्यतिथिचे वेळचें )

पुण्यतिथी दिवस आज। उदया पावला ॥
म्हणुन चित्ति ध्याईयलें। सांई पावला ॥ धृ ०॥

अश्विनिची दशमि शुद्ध। वार मंगळ।
साई गुरु पदांकीता। नित्य मंगळ ॥
देह ठेवि सांईनाथ। शिर्डी मस्जिदीं।
भक्तसंघ प्रेमभरें। चरण पूजिती ॥
भक्तिहीन नीळकंठ। लाविला पदीं।
भक्तप्रेम पाहतांचि। नभि न मावला ॥ पुण्य ० ॥ १ ॥

## पद

धन्य धन्य हा दिन आजिचा ॥ हो धन्य धन्य हा ॥ धृ० ॥ आगमनानें कीं आपुल्या या । कमल नयन जगतात भेटला मज साचा ॥ धन्य धन्य हा० ॥ १ ॥ महापुनित तें तट गोदेचें । शिर्डी ह्मणती ज्या ग्रामातें । निवास स्थल तें गुरुरायाचें ॥ जेथ वसे साईनाथ । विसावा सब जीविंचा ॥ धन्य० ॥ २ ॥

## --ब्रह्मार्पण--

### ॥ आर्या ॥

कृष्णार्पण होवो हें, सुखदायक गोड बोल बाळाचे ।
करद्वय जोडूनि विनती, पुरवो लडिवाळ कृष्ण बाळाचे ॥ १ ॥

### ॥ भजन ॥

सांईनाथ गुरु माझे आई ।
मजला ठाव द्यावा पायीं ॥ १ ॥

## येत्या रामनवमीच्या उत्सवाचा कार्यक्रम.

सालाबादप्रमाणें श्रीसच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संतचूडामणी समर्थ श्री साईबाबा ( संस्थान शिर्डी तालुके कोपरगांव, जि. नगर ) यांचा श्रीरामजयंतीचा उत्सव ता. २१ एप्रिल सन १९२६ इ. चैत्र शुद्धपक्ष ९ शके १८४८ रोजीं शिर्डी येथें होणार आहे. तरी समर्थांच्या भक्त मंडळींनी व मोक्षेच्छु जनांनी निजहितार्थ महाराजांच्या पवित्र चरणांचे दर्शनासाठीं व तीर्थप्रसादासाठीं आपल्या मित्रमंडळीसह अवश्य येण्याचें करावें, कळावें.

मंगळवार ता. २०-४-२६ चैत्र शु॥ ८ श्रीची स्थापना, दुपारीं कीर्तन.

बुधवार ता. २१-४-२६ जन्मोत्सव, अभिषेक, ब्राह्मण भोजन, काठ्यांची व रथाची मिरवणूक.

गुरुवार ता. २२-४-२६ मल्लांच्या कुस्त्या, रात्रौ दारुकाम व कीर्तन.

शुक्रवार ता. २३-४-२६ रात्रौ कीर्तन व पालखीची मिरवणूक.

शनिवार ता. २४-४-२६ काला व तीर्थप्रसाद.

सर्व मंडळीच्या तर्फे सर्व संतांचा चरणरज,

दासगण.

### अगत्याची विनंति

ज्यांचेकडून या मासिकाची शके १८४७ ची वर्गणी अजून आलेली नाहीं त्यांनी ती कृपा करून लवकर पाठविण्याची तजवीज करावी व शके १८४८ चे सालासाठीं ज्यांना मासिक सुरू ठेवण्याचें असेल त्यांनीही आगाऊ वर्गणी मनिआर्डरीनें ही जाहिरात पहातांच पाठवावी. ज्यांचे कडून अधिक चैत्र अखेरपर्यंत वर्गणी येणार नाहीं त्यांजला अंक सुरू ठेवण्याची त्यांची इच्छा समजून अधिक चैत्राचा अंक व्ही. पी. ने पाठविला जाईल. तरी व्ही. पी. परत करून मासिकाचे फंडास कोणीही खर्चांत घालणार नाहीं अशी उमेद आहे.

शिवाय या अंकाचीं पृष्ठें ४० चे ऐवजी ४८ झाली आहेत तितकीं पुढील अंकांत कमी केलीं जातील.

# आत्मबोध--जन्मोत्सव अंक.

भैरवा ध्वजारोपणाचे दिवशीं म्हणजे श्रीनाथमहाराजांच्या जन्मोत्सवाचे दिवशीं ( ता. १३-४-२६ रोजीं ) प्रसिद्ध होईल. सदर अंकांत श्रीनाथांच्या समकालीन ब्रह्मीभूत व विद्यमान विभूति श्रीदीक्षितनाथ महाराज, श्रीपरमहंसमहाराज नाशिक, श्री. धोंडीबुवामहाराज पलुसकर, श्रीसाईनाथमहाराज, श्रीगोविंद महाराज सोनगीर, श्रीउपासनीमहाराज साकोरी इत्यादिकांचीं फोटोसह त्रोटक चरित्रें देण्याचा आमचा विचार आहे. आतांपर्यंत खालील लेखकांनीं लेखांचें अभिवचन दिलें आहे व कांहींचे लेख आलेही आहेत.

कै. रा. ब. जस्टिस कीर्तने ( अवतार-रहस्य ), श्रीमंत सरदार किबेसाहेब, श्री. चिं. वैद्य, श्री. स. बा. हुदलीकर, श्री. वाळगकर, श्रीमंत सौ. कमलाबाईसाहेब किबे इ."

हें कार्य अतिशय खर्चाचें आहे. हल्लींच्या अंकापेक्षां जवळ जवळ दुप्पट पानें, सुंदर, गुळगुळीत, जाड, देशी कागद व निरनिराळ्या शाईत फोटो इतकें असून तो वर्गणीदारांस मिळेल. वार्षिक वर्गणी ट. ख. सह तीन रुपये, व्ही. पी. खर्च ८० निराळा. तरी नवीन होणाऱ्या वर्गणीदारांनीं अशी संधि घालवूं नये. इतरांस फक्त हाच **फुटकळ अंक** १२ आणे. ट. ख. ४ आणे. चालू वर्षी जाहिराती घ्याव्यांत असें मंडळानें ठरविल्यामुळें जाहिरात देणारांनीं त्वरा करावी. आत्मबोधाचा खप शहरापासून तो अगदीं लहान खेड्यांतही असल्यामुळें प्रसिद्धीचें कार्य अगदीं अल्प वेतनांत होईल. जाहिरातीचे दर समक्ष अथवा पत्रद्वारें.

**चिटणीस**:—श्रीनाथकार्य-प्रवर्तक-मंडळ, सरस्वती-निकेतन,
इंदूर छावणी.

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, २६४ ठाकुरद्वार, मुंबई
येथें **अनंत आत्माराम मोरमकर** यांनीं छापून
रा. आ. तर्खड यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड, बांद्रें येथें प्रसिद्ध केलें.